

# श्री साईलीला

व्हेंबर    कि. ५० पैसे    १

# या अंकांत—

१ सुवर्णमहोत्सवाची यशस्वी सांगता
२ सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीचा सोहळा
३ साईभक्त बशीरबाबा
४ ग्रंथ—परिचय
५ नीतिशास्त्राचा निकष
६ परमसिद्ध श्रीसाईबाबा
७ सर्वव्यापी अध्यात्म
८ या देवाचा खेळ निराळा
९ साईनाथ वंद्य एक सद्गुरू जगीं



# श्री साई वाक्सुधा

साईबाबा म्हणजे दयेचा महासागर. कोणतेंही व कोणाचेंही दुःख पाहून त्यांचें सदा दयाळ अंतःकरण विरघळून जात असे. त्यांना आपल्या भक्तांबद्दल आत्यंतिक जिव्हाळा वाटावयाचा. भक्त म्हणजे आपले कुटुंबीजन. आईला जसा आपल्या लेकराचा कळवळा वाटतो, तसाच कळवळा त्यांना आपल्या भक्तांबद्दल वाटत असे. मात्र भक्तांच्याठायीं संपूर्ण श्रद्धा हवी.

—श्रीसाईचरित्र


## श्री साईलीला

सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी विशेषांक

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] नोवेंबर १९६८ [ अंक ८ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख सह)

टे. नं ४४३३६१

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,

प्लॉट नं ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# सुवर्ण महोत्सवाची यशस्वी सांगता

**प्रिय वाचक :—**

लिहिण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं पूर्वनियोजित योजनेप्रमाणें शिरडी व मुंबई येथील साईबाबांची सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी मोठ्या समारोहानें नि अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडली. मुंबईंत तर हजारो नव्हे लक्षावधि भक्तांनीं साईबाबांच्या पादुकांचें भक्तिभावपूर्वक दर्शन घेतलें.

मुंबईत्त साजऱ्या झालेल्या या महोत्सवाची व्यापकता, भव्यता व यशस्वीता लक्षांत घेतां शिरडीप्रमाणें मुंबईंतही हा महोत्सव साजरा करण्याचें उत्सवसमितीनें स्वीकारलेलें धोरण सर्वथैव योग्यच नव्हे तर अत्यंत अत्यावश्यक होतें असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

साईबाबांचें अखंड वास्तव्य शिरडींत झालें, तेथेंच त्यानीं महासमाधि घेतली व त्याच गांवीं त्यांचें समाधि–मंदिर आहे वगैरे दृष्टीनीं शिरडी येथें हा सुवर्णमहोत्सव साजरा करणें योग्य होतेंच व त्याप्रमाणें दहा दिवसांचा कथा–कीर्तनांचा, प्रवचनांचा व गायनवादनाचा कार्यक्रम आखून तेथें तो पार पाडण्यांत आला. भारतीय कीर्तीच्या थोर कलावंतांनीं व विद्वानांनीं त्या उत्सवांत स्वार्थत्यागपूर्वक व बाबांसंबंधींच्या भक्तिभावानें प्रेरित होऊन भाग घेतला हें त्यांना केव्हांही भूषणावह आहे.

बाबांच्या भक्तिभावानें भारावलेला कोण नाहीं ? त्यांच्या जीवनकार्याचा इष्ट तो परिणाम कोणावर घडलेला नाहीं ? स्त्री असो; पुरुष असो; गरीब असो; श्रीमंत असो, लहान अधिकारी असो वा उच्च पदाधिकारी असो. बाबांच्या कार्याची महती सर्वांनाच पटलेली आहे.

बाबांचें कार्य म्हणजे भूतदयेचें, लोककल्याणाचें व दुःखितांना दुःखमुक्त करून त्यांना शाश्वत सुखाचा मार्ग दाखविणारें कार्य. त्या कार्याची मोहिनी कोणाच्या मनावर पडणार नाहीं ?

या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे सर्व थरांतील स्त्री पुरुष शिरडी येथें व मुंबईंत एकत्र जमा होण्यांत झाला. बाबांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीचा हा उत्सव जास्तींत जास्त यशस्वी रीतीनें पार पडला पाहिजे व त्यासाठीं आपणास जितकें झटतां येईल तितकें झटणें हें आमचें परम पवित्र कर्तव्य आहे, असें प्रत्येकास वाटत होतें.

दोन्हीं ठिकाणच्या उत्सवप्रसंगीं लहानथोर स्त्रीपुरुषांनीं जी मेहनत घेतली व जो कार्योत्साह प्रकट केला त्याचें वर्णन कोणत्या शब्दांनीं करावें हेंच समजत नाहीं. साईबाबांची अल्पस्वल्प सेवा करण्याची ही एक नामी सुसंधी आपणास लाभली आहे असें प्रत्येकानें मानलें. दोन्हीं ठिकाणचे उत्सव यशस्वी रीतीनें पार पडले याचें प्रमुख कारण जर कोणतें असेल तर तें म्हणजे भक्तांनीं दिलेला उत्स्फूर्त सहकार हेंच होय. बाबांनीं या सर्व भक्तांवर आपल्या कृपेची अखंड पाखर घालावी व त्यांचें कोटकल्याण करावें, हीच त्यांच्या चरणीं आमची अनन्यभावें प्रार्थना आहे.

—संपादक

× × ×

# मुंबईंतील पुण्यतिथी महोत्सवाचा सोहळा

मुंबईंत साजरा होणाऱ्या सुवर्णमहोत्सवासाठीं शिरडी येथील समाधी मंदिरांतील बाबांच्या पादुका मुंबईंत समारोहानें आणावयाच्या होत्या. तेथील कांहीं ग्रामस्थांनीं आरंभीं पादुका मुंबईस नेण्यास विरोध केला; परंतु तेथील उत्सवाचा कार्यक्रम संपतांच त्या परत आणण्यांत येणार आहेत, अशी वास्तव समज दिल्यानंतर आरंभींचा तो विरोध मावळला व सारेजण वाजत गाजत निघालेल्या पालखीला भक्तिभावपूर्वक निरोप देण्यासाठीं गांवाच्या सीमेपर्यंत आले. याबद्दल त्यांना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच होतील.

शिरडी ते मुंबई हा पादुकांचा प्रवास अत्यंत गाजावाजांत पार पडला. मार्गांत अनेक ठिकाणी पूर्वनियोजित योजनेप्रमाणें असंख्य लोकांना पादुकांचें दर्शन घेतां आलें. सायन् (शींव) हें मुम्बईचें महाद्वार. त्याठिकाणी रस्त्याच्या कडेस सुंदर मंडप घालून तेथें मुम्बई नगरीतर्फे पादुकांचें सुस्वागत ना. पागे व

स्वागत समितींतील इतर सदस्यांनीं यथोचितपणें केलें. सुमारें ५०।६० सुवासिनींनीं तेथें आरत्या ओवाळल्या व साईबाबांची आरती म्हणण्यांत आली.

त्या ठिकाणीं बरोबर पांच वाजतां पादुकांचें आगमन झालें. स्वागतसमारंभ ५।१० मिनिटांत आटोपल्यानंतर मुद्दाम तयार करवून घेण्यांत आलेल्या चांदीच्या रथांतील आसनावर पादुकांची स्थापना करण्यांत आली व तेथून परळवरील सेंट झेविअर कॉलेज जिमखान्यावर खास उभारण्यांत आलेल्या तात्पुरत्या समाधि मंदिरांत त्या न्यावयाच्या होत्या.

हें अंतर सुमारें चार मैलांचें असावें. मिरवणूक पांच वाजतां सुरू झाली व त्या स्थळीं पोहोंचेपर्यंत साडे आठ वाजले. रस्त्यावर दुतर्फा स्त्रीपुरुष रांगेनें उभे होते. ठिकठिकाणीं पादुकांना हार अर्पण करण्यांत येत होते. बँड, लेझीम, भजनी मंडळ्या वगैरे मिरवणुकींतील सर्व थाट भव्य व प्रेक्षणीय होता. मिरवणुकीच्या अग्रभागीं अर्थमंत्री ना. वानखेडे, कौन्सिल सभापती ना. पागे, मद्रासहून आलेले श्री. राधाकृष्णस्वामी वगैरे मंडळी होती. स्वयंसेवक व पोलिस यानीं एकंदर बंदोबस्त फार उत्तम प्रकारें ठेविला होता.

जिमखाना पटांगणावर प्रत्यक्ष बाबांच्या शिरडीचा भास होत होता. तें समाधिमंदिर, ती द्वारकामाई, तीं शिरडींतील मंदिराभोंवतालचीं दुकानें, अगदीं शिरडींतील सभामंदिरांत प्रवेश करावा तसें भक्तांना वाटत होतें. मुंबईंत हजारो नव्हे, लक्षावधि भक्तांनीं त्या ठिकाणीं साईबाबांच्या पादुकांचें दर्शन घेतलें. रोज मैल दीड मैलपर्यंत भक्तजन रांगेनें उभे असत. सायंकाळीं चार वाजल्यापसून भक्तांची गर्दी विशेष मोठ्या प्रमाणांत होऊन ती उत्तरोत्तर वाढत जात असे व हा दर्शनाचा कार्यक्रम रात्रभर चालत असे.

सकाळीं पूजाअर्चा, अभिषेक सायंकाळीं कथ कीर्तन, प्रवचन व रात्रौ नऊ वाजल्यापासून श्री. वसंत देसाई व पाडुरंग दीक्षित यांच्या नेतृत्वाखालीं सुस्वर भजन, गायन, नृत्य वगैरे अत्यंत मनोवेधक कार्यक्रम सुरू असत.

सोमवार ता. १५ हा या सुवर्णमहोत्सवांतील शेवटचा तसाच महत्त्वाचा दिवस होता. त्या दिवशीं उत्सवाचा समारोप व्हावयाचा व साईफौंडेशनची योजना जाहिर करण्यांत यावयाची होती; त्याचप्रमाणें या महोत्सवानिमित्त

शिरडीसंस्थानतर्फे श्री. पागे यांच्या संपादनाखालीं तयार करण्यांत आलेलीं प्रकाशनें प्रकाशित व्हावयाचीं होतीं.

इंदूरचे माजी न्यायमूर्ती, साईबाबांचे निष्ठावान् थोर भक्त व ज्यांना त्यांचा सहवास आठ वर्षें लाभला असे माननीय श्री. बाळासाहेब रेगे हे या समारंभाला अध्यक्ष लाभले होते. हा योगायोग अत्यंत उचीत व कोणीही मान डोलवावी, अशा प्रकारचा होता. त्यांचें वय आज ८०-८५ वर्षांचें असून चेहऱ्यावरील तेज अत्यंत आकर्षक आहे. त्यांचा हा लाभ बाबांच्याच कृपेनें झाला असावा.

आरंभीं महाराष्ट्राचे अर्थमंत्री व सुवर्णमहोत्सव समितीचे सन्माननीय अध्यक्ष ना. वानखेडे यानीं अध्यक्षांचें नि सर्वांचें स्वागत करून त्यानीं एकंदर कार्याचा थोडक्यांत आढावा घेतला. त्याचबरोबर नुकतीच ज्यांची प्राणज्योत मालवली त्या संत तुकडोजी महाराजांना त्यानीं भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

त्यानंतर त्यानीं श्रीसाईबाबा फाऊंडेशनच्या कार्याची माहितीं करून दिली. पुढें ते म्हणाले, आज आपल्या देशाला एकात्मभावाची अत्यंत जरूरी आहे. साईबाबा म्हणजे एकात्म भावाचें प्रतीक होय. त्यांना प्रिय असलेल्या कार्याचा प्रसार या फौंडेशनमार्फत व्हावयाचा आहे.

त्यानंतर बाबांच्या या कार्याचा प्रसार मद्राससारख्या इतर प्रांतांतूनही कसकसा होत आहे याची कल्पना करून देऊन ना. वानखेडे म्हणाले, साईबाबांवर लोकांची असीम भक्ति आहे. त्या भक्तिभावाचें फळ त्यांना आजही अपेक्षे-प्रमाणें मिळत आहे. मला येथें जातां जातां एकाच अनुभवाचा उल्लेख करा-वासा वाटतो. भूतदयेचें, रोगनिवारणाचें व लोकांना रोगमुक्त करण्याचें कार्य हें बाबांच्या जिव्हाळ्याचें कार्य होतें. तें पार पाडण्यासाठीं शिरडींत एक अद्ययावत् व सर्वप्रकारें सुसज्ज असें हॉस्पिटल सुरू करण्यांत आलें आहे. तेथें डॉक्टर्स व परिचारिका यांच्या रहाण्याची सोय करण्यासाठीं जागेची फार जरूरी होती. बाबांच्या कृपेनें हॉस्पिटलजवळच दोन एकर जागा मिळविण्यांत आली. त्या जागेसाठीं व तत्संबंधीं सरकारी कागदपत्र तयार करण्यासाठीं एकूण खर्च १२७२५ रु. आला. ही रक्कम उभी कशी करावी, या चिंतेंत

असतां ती बाबांनीच दूर केली. मंदिरांतील पेटींत त्या आठवड्यांत नेमकी तेवढीच रक्कम जमा झालेली आढळून आली. पेटींत कांहीं ठराविक प्रमाणांत भक्तांच्या देणग्यांमुळें रक्कम जमा होत असते.

त्यानंतर साईबाबांच्या एकनिष्ठ भक्त श्रीमती मणी साहुकार (यांचे बाबांसंबंधीं अनेक लेख साईलीलेंत यापूर्वी प्रसिद्ध झाले आहेत.) यांचें भावस्पर्शी भाषण झालें.

कायदेमंडळाचे अध्यक्ष श्री. व्ही. एस. पागे यानीं आपल्या भाषणांत साईबाबा फौंडेशनसंबंधीं व भावी कालांतील कार्यसंबंधीं विशेष माहिती करून दिली. फौंडेशनचें कार्य सुरू झाल्याचें अध्यक्ष यानीं जाहीर करून संस्थानतर्फे काढण्यांत आलेल्या स्मरणिकेचें प्रकाशन करावें अशी अध्यक्षांस विनंती केली.

या संस्मरणीय समारंभाचे माननीय अध्यक्ष श्री. बाळासाहेब रेगे यानीं यानंतर बाबांचेंच कार्य जोमानें चालविण्यासाठी श्रीसाईबाबा फौंडेशनची स्थापन होत असल्याचें जाहीर करून स्मरणिकेचें प्रकाशन केलें.

अध्यक्षानीं संत तुकडोजी महाराज यांस श्रद्धांजलि अर्पण करतांना त्यांच्यासंबंधींच्या आपल्या कांहीं भावस्पर्शी आठवणीही सांगितल्या.

श्रीसाईबाबांची व आपली भेट कशी झाली व त्यांच्या कृपाछत्राखालीं अखंड वावरण्याचें भाग्य आपल्या वाट्यास कसें आलें, याची त्यानीं जाणीव करून दिली. ( हें भाषण विस्तृतपणें पुढील अंकीं प्रसिद्ध होईल. )

शेवटीं ते म्हणाले, श्रीसाई फौंडेशन हा माझ्या गुरुदेवांच्या कार्याचा पाया आहे. या पायावर यापुढील काळांत आपल्या सर्वांच्या सहकारानें सुंदर इमारत उभी व्हावयाची आहे. त्यासाठीं आपला सारा प्रेमभाव व भक्तिभाव आपण अर्पण करावा. या कार्यांत जास्तींत जास्त जोम निर्माण करावा. या फौंडेशनद्वारें जो पैसा उभा केला जाईल, त्या पैशाचा विनियोग बाबांना अत्यंत प्रिय असलेल्या लोककल्याणाच्या कार्याकडे व्हावयाचा आहे. आपण श्रद्धेनें व सबुरीनें हें कार्य जितकें वाढवितां येईल तितकें वाढवावें. श्रद्धा, सबुरी नि विश्वप्रेम हीं जीं बाबांचीं तीन महान् तत्वें, त्यांचेंच प्रतिपालन या नवनिर्मित संस्थेकडून व्हावयाचें आहे.

असें हें कार्य उत्तरोत्तर फोफावत गेलें पाहिजे. मी माझ्या गुरुदेवापाशीं (श्रीसाईबाबा) अशी अनन्यभावें प्रार्थना करतों कीं, "महाराज ! आपण या कार्याला आपले संपूर्ण आशीर्वाद द्या. या कार्यांत जीं जीं माणसें भक्तिभावानें भाग घेत आहेत त्यांना संपूर्ण यश द्या. कार्यकर्त्यांना कार्य करण्याची शक्ति द्या व आपलें कार्य त्यांच्याकडून पार पाडून घ्या."

त्यांनतर ना. बाळासाहेब भारदे यानीं आभारप्रदर्शन केलें. अशा रीतीनें या सुवर्णमहोत्सवाची सुन्दर सांगता झाली.

त्या दिवशीं रात्रीचा संगीत गायन वादन नृत्याचा कार्यक्रमही चांगला रंगला.

शिरडी संस्थानचे माननीय रिसिव्हर व ज्यानीं सतत गेले ८।९ महिने बाबांचा हा सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीउत्सव यशस्वी रीतीनें पार पडावा यासाठीं रात्रंदिवस आपल्या जिवाचें रान केलें व अविश्रांत मेहनत घेतली ते श्री. द. दि. पाटणकर यानीं उत्सव यशस्वीरीतीनें पार पडावा म्हणून ज्यानीं ज्यानीं सहकार दिला त्या सर्वांचे शिरडीसंस्थानतर्फे आभार मानिले.

त्यानंतर मंगळवारीं सकाळीं बाबांच्या पादुकांची पूजाअर्चा, आरती वगैरे कार्यक्रम होऊन त्या मिरवणुकीनें खोपोली, लोणावळा, पुणें, देहू, आळंदी व नगर या मार्गानें परत शिरडी येथील मंदिरांत नेण्यांत आल्या.


## विवाह विषयक

आंतर जातीय सुशिक्षित महाराष्ट्रियन वधुवरांची भरपूर स्थळें आहेत. प्रथम वरांची नोंद बिनामूल्य करतों. अधिक माहितीसाठी समक्ष भेटून आमच्या कार्यपद्धती संबंधी संपूर्ण खात्री झाल्यावरच नांवे नोंदवा सविस्तर लिहा. ( फोन. ३१२००५ )

सौ. आशाताई कुलकर्णी

३१६. अ. जगन्नाथ शंकरशेठ रोड,
ठाकुरद्वार नाका, मुंबई २.

# साईभक्त बशीर बाबा

## एका थोर साईभक्ताचें जीवनकार्य

साईबाबांपासून प्रेरणा मिळवून लोककल्याणाचें कार्य झटून करणारे त्यांचे परम भक्त जागोजाग आढळून येतात. त्यांपैकींच बशीरबाबा हे एक आहेत. केवळ स्वतःचे कल्याण साधलें म्हणजे झालें आपले जीवनकार्य असें मानून, जीवन व्यतीत करणारीं माणसें तुम्हाला ठायीं ठायीं आढळून येतील; परंतु तें जीवन अहोरात्र लोकोपकारार्थ राबविणारीं परोपकारी माणसें मात्र क्वचितच आढळून येतात. बशीरबाबा हे तशा थोर माणसांपैकीं एक आहेत.

बशीरबाबांचा जन्म आंध्रप्रांतांतील कडाप्पा जिल्ह्यांत चेन्नूर या नावाचें एक गांव आहे त्या गावांतील एका मुस्लीम कुटुंबांत १९४२ सालीं झाला. नुकतीच त्यांची पंचविशी उलटून गेली आहे. ऐन तारुण्यांत त्यांना देवभक्तीचें व लोकसेवेचें वेड लागलें.

त्यांचे वडील महंमद हुसेन हे एक सुसंपन्न नि खानदानी गृहस्थ असून आपल्या चिरंजीवानें आजच्या काळांत मिळवितां येणारे उच्चांत उच्च शिक्षण घेऊन आपलें जीवन वैभवात, व सुखासमाधानांत घालवावें हीच त्यांची एकमेव आकांक्षा होती. महंमद हुसेन हे मुस्लीम धर्मांतील एक धर्मनिष्ठ व आचारसंपन्न गृहस्थ होते. समाजांत त्यांना मानमान्यता होती.

परंतु बशीरला वडिलांचा मार्ग संमत नव्हता. त्याला त्यागाचें व साधेपणाचें जीवन आवडूं लागले. त्यानें समजूं लागल्यापासून कपड्यालत्त्यांची आवड सोडून दिली. नेसायला एक शुभ्र पंचा व अंगावर ओढायला एक लहानसें धोतर त्याचाच आधार मस्तकाला. तेंच धोतर डोक्यावरून गुंडाळून घ्यायचें. झालें; एवढाच त्याचा पोषाख. वेष साधा व दिसायला बावळट; परंतु डोळ्यांत तेज मात्र कोणाच्याही सहज लक्षांत येण्याजोगें.

## वडिलांची इच्छा

वडिलांनी या मुलासाठीं करायचें कांहीं शिल्लक ठेवलें नाहीं; परंतु बशीरला त्याची कदर नव्हती. त्याचें लक्ष लागून राहिलें होतें दुसरीकडे. त्यांना सर्वसामान्यांचें तें जीवन नको होतें. त्याची उत्कंठा वेगळीच होती. एके दिवशीं घरादाराचा व जिवलगांचा स्नेहसंबंध तडाड तोडून ते घराबाहेर पडले. ते गेले कुठें? त्यांच्या गावापासून सुमारें पंधरा मैलावर दत्तात्रेय टेकडी नावाचें एक एकांतस्थान आहे. तेथें लहानमोठ्या काळोख्या गुहा होत्या. त्यांत मनुष्यप्राणी रहाण्याची शक्यता नव्हती व कोणी रहातही नसे. बशीरनें त्यांतील एक गुहा स्वतःच्या वास्तव्यासाठीं पसंत केली. त्या गुहांत वस्ती कोणाची असे माहित आहे? जंगलांतील रानटी हिंसक श्वापदें, सर्प, अजगर वगैरेंची!

परंतु हें सर्व जाणूनबुजून बशीरनें त्याच भयाण व उपद्रवी जागेची स्वतःसाठीं निवड केली. माणसानें कोणत्याही गोष्टीचा श्रद्धापूर्वक निर्धार करावा लागतो.

जीव जावो अथवा राहो। पांडुरंगीं माझा भावो॥

असा आहे हा प्रकार!

## बशीरची तपस्या

बशीरनें निर्धारपूर्वक एका काळोख्या गुहेंत प्रवेश केला खरा; परंतु मानवी स्वभावास अनुसरून त्याचें अंग त्यावेळीं थरथर कांपत होतें. निराश वाटलें तरी श्रद्धेचें बळ पाठीशीं होतें.

अशा परिस्थितींत कोणाला हांक मारायची? संकटांत सांपडलेल्याना मार्ग कोणी दाखवायचा व त्याच्या रक्षणार्थ धांव कोणी ठोकायची? आजवर संकटांत सांपडलेल्यास ज्यानें संकटमुक्त केलें त्या भगवंताला!

असें सांगतात कीं, त्या असहाय्य परिस्थितींत गरीबांचे व भक्तांचे वाली साईनाथ त्याच्यापुढें हजर झाले व त्याला कोणत्या मार्गानें जायचें तो मार्ग त्यानीं दाखविला. हातांतील दर्भानें त्यानीं त्याच्या जिव्हेला स्पर्श केला. त्याची भीति दूर झाली. त्याला ज्ञानप्राप्ति झाली व सर्वत्र शांत भासूं लागलें! बाबा

केवळ दर्शन देऊन थांबले नाहींत तर त्याला आपल्या पायांतील एक खडावा व हातांतील कमंडलूसारखें भांडें प्रसादादाखल दिलें.

या दोन्हीं वस्तु ज्यांना पहायच्या असतील त्यांना त्या रामनवमीच्या दिवशीं हनमकोंडा येथील साईप्रचार मंदिरांत पहायला मिळण्याची सोय करण्यांत आली आहे.

बशीरचे आईवडील नि नातलग त्याच्या शोधांत होतेच. कांहीं दिवसांनंतर त्यांना त्याचा शोध लागला. बशीरला घरीं आणण्यांत आलें. तो आतां शांत झालेला होता. कोणाला दुखवायचें नाहीं हा त्याचा एक नियम होता त्यानें वळणावर यावें व इतर संसारी माणसांप्रमाणें वागावें असें त्याच्या वडिलांस फार वाटे. परंतु ऐषआरामाचीं सर्व साधनें समोंवार असतां बशीर त्यांच्याकडे ढुंकूनही पहात नसे.

**वडील मंडळीचा विचार**

वडील मंडळीस वाटलें कीं याचें लग्न करून टाकावें म्हणजे तो आपोआप सुधारेल !

बशीरनें आढेवेढे घेतले नाहींत. "माझं लग्न करणार ! करून टाका ! तुमचं समाधान होऊ द्या !" अशी होती त्याची वृत्ति.

बशीरचें लग्न झालें. कांहीं दिवस त्यानें आपल्या कुटुंबीजनांत काढले. नवविवाहित पत्नीकडे मात्र तो मातेच्या दृष्टीनें पहात असे. त्याच्या अंगीं वैराग्य पूर्णपणें बाणलें होतें. त्याला तो काय करणार ? त्याला ध्यानीं मनीं साईबाबांशिवाय दुसरें कांहीं येत नसे.

काय करावें ? केव्हां घराबाहेर पडावें ? या विचारांत असतां एके दिवशीं आपलें म्हणून जवळ जें जें कांहीं होतें तें पत्नीच्या स्वाधीन करून त्यानें तिचा व घरादाराचा निरोप घेतला व निष्कांचन स्थितींत तो घराबाहेर पडला. बाबांवर बशीरची असीम श्रद्धा. तेच मार्ग दाखविणारे नि आपलें कार्य त्यांच्याकडून करवून घेणारे ! त्यानी आपल्यापुढें एक निश्चित ध्येय ठेविलें होतें. बाबांचें पुण्यस्मरण हें फलदायक व जीवनांत आनंदाची निर्मिती करणारें आहे; तेव्हां तें कोनाकोपऱ्यांतून पसरलें पाहिजे. त्यासाठीं आपण झटायचें. त्या दृष्टीनें जें कांहीं करतां येईल तें करावयाचें, ही त्यांची दृष्टि होती व आजही आहे.

## सर्वांना सारखी वागणूक

त्या दृष्टीनें पहातां बशीरबाबा भारतांत नि सीलोनमध्यें ज्या ज्या ठिकाणीं हिंडले फिरले त्या त्या ठिकाणीं त्यानीं बाबांची कीर्ति पसरविली. आपण शक्य तों प्रकाशांत न येतां मागें राहून जें साधतां येईल तें साधावयाचें त्यांच्याठायीं चमत्कार करून दाखविण्याचें सामर्थ्य बाबांच्या कृपेनें आलेलें आहे; परंतु कोण-त्याही बाबतींत त्याचें प्रदर्शन करायचें नाहीं, हा आहे त्यांचा बाणा. आई जशी आपल्या मुलाशीं निर्हेतुक प्रेमानें व निःस्वार्थपणें वागते तसें आहे त्यांचें सर्वांशीं वागणें. कोणत्याही बाबतींत ते भेदभाव बाळगीत नाहींत. सर्वांना सारखी वागणूक. हेंच पहा, बशीरबाबाना भेटून त्यांच्याकडून आपापले प्रश्न सोडवून घेण्यासाठीं रोज नानाप्रकारची माणसें येतात. त्यांत अधिकारी असतात; श्रीमंत असतात व गोरगरीबही असतात. सर्वांशीं वागणूक सारखी. जो जसा येईल त्याप्रमाणें त्याची भेट. तेथें अधिकारपद किंवा श्रीमंती यांना अग्रहक्क नाहीं.

जो त्यांच्या भेटीला जातो त्याला आनंद व समाधान वाटल्याशिवाय रहात नाही. प्रत्येकाचाच हा अनुभव आहे. त्यांना सर्व धर्मांचें व त्यात्या धर्मांतील प्रमुख ग्रंथाचें संपूर्ण ज्ञान आहे. त्यामुळे कोणीही आश्चर्यानें थक्क झाल्याशिवाय रहात नाहीं. गीतेंतील श्लोक त्यांना जसे मुखोद्गत आहेत, त्याचप्रमाणें बायबल-मधील व कुराणांतील वचनेंही मुखोद्गत आहेत.

## कोणीही या; मी तुमचाच आहें.

त्यांच्याकडे कोणीही जावो. पुण्यवान् जावो, अत्यंत पापी जावो, गरीब जावो, श्रीमंत जावो. पुरुष वा स्त्री जावो. सर्वांना त्यांचें हेंच सांगणें आहे कीं, "या खुशाल या, तुम्हीं कोणीही असा. माझ्या अंतःकरणाचे दरवाजे तुमच्या-साठीं खुले आहेत. तुम्हांला साऱ्या जगानें त्याज्य ठरविलें असलें तरी मी तुम्हांला टाकणार नाहीं. मातेच्या प्रेमानें जवळ घेईन नि कुरवाळीन. तुमच्या चिंतेचें ओझें मी शिरावर घेईन आणि तुम्हांला सुखी करण्याचा प्रयत्न करीन," केवढें प्रभावी आश्वासन आहे हें ! बाबांनीं आपल्या भक्तांना अशाच प्रकारचें आश्वासन कायमचें देऊन ठेवलें आहे नाही कां ? आणि त्यांचे स्वतःला अनुयायी नि भक्त म्हणविणाऱ्या बशीरबाबानीं बाबांचे तेंच कार्य पुढें चालविलें आहे.

त्यांच्या एका भक्तानें त्यांची भेट घेऊन त्यांना कांही प्रश्न विचारले. ते प्रश्न आणि त्यांचीं उत्तरें आमच्या वाचकांसाठीं येथें देणें जरूर वाटतें.

**कांहीं महत्त्वाचीं प्रश्नोत्तरें**

प्रश्नः—आम्हां सर्वसाधारण लोकांसाठीं आपण एका वाक्यांत एखादा संदेश द्याल का ?

उत्तरः—कां नाहीं देणार ? तुमच्याठायीं जें रावणाचें वास्तव्य आहे तें झाडून टाका व तुम्हीं श्रीराम बनण्यासाठीं झटा !

प्रश्नः—पूजा अर्चा, भजन कीर्तन यांत वेळ घालविणें जरूर आहे असें वाटतें आपणास ?

उत्तरः—मोठा पाऊस लागूं लागला म्हणजे आपण छत्रीचा उपयोग करतों नाहीं का? जीवन हा एक प्रवास आहे. वाटेंत सुखदुःखाचे खांचखळगे ओलांडावे लागतात. ते ओलांडण्यासाठीं भजन वगैरेचा जरूर उपयोग होतो.

प्रश्नः—संसारी माणसांना तुम्हीं कोणता सल्ला द्याल ? त्यानीं संसाराचा त्याग करून सन्यासमार्ग स्वीकारावा असें वाटतें का आपल्यास?

उत्तरः—सुळींच नाहीं ! प्रत्येक संसारी माणसानें आपला संसार उत्तम-प्रकारें करावा. कौटुंबिक जबाबदाऱ्यांचें दक्षतापूर्वक प्रतिपालन करावें व कर्तव्याचरण इमानें इतबारें करून भगवंताकडे सतत लक्ष ठेवावें. क्षणभर-ही त्याच्या विसरपडूं देऊं नये. भगवंताच्या दर्शनासाठीं बाहेर पडलेला यात्रेकरू मार्गांत धर्मशाळेमध्यें मुक्काम करतो व नंतर नव्या दमानें पुढील प्रवास सुरू करतो, तसेंच आहे हें संसारी जीवन.

**एका संगीत-दिग्दर्शकाची व्यथा**

आपलीं संसारिक दुःखें दूर व्हावीं, आपणास बढती मिळावी किंवा जरूर ती शांति मिळावी अशा विविध हेतूंनीं साईबाबांकडे नानाक्षेत्रांतील लोक प्रत्यहीं जात असत. तसेच नाना क्षेत्रांतील लोक, बशीर बाबा जेथें जेथें जातात तेथें तेथें त्यांच्या भेटीसाठीं जातात. परंतु त्यांची भेट होतांच त्यानां ज्या फायद्यासाठीं आपण आलों त्या संसारिक दुःखाचा विसर पडतो. त्यानां पहातांच त्यांचें अंतःकरण दैवी विचारांनीं भरून जातें.

उदाहरणादाखल येथें एक नमुनेदार घटना नमूद करावीशी वाटतेः—सिनेमाव्यवसायाशीं निकट संबंध असलेल्या एका संगीत दिग्दर्शकाची ही कथा

आहे. व्यवसायांत भारी नुकसान आल्यामुळें निराशेनें नि चिंतनें काळवंडलेली ती व्यक्ति होती. त्यानीं बशीर बाबांचें दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद मिळविले. आणि तदनंतर त्यांची साफ बिघडलेली आर्थिक घडी चांगली दुरुस्त झाली. त्यांची चिंता दूर झाली ! त्यानीं साईप्रचारासाठीं एक मोठी रक्कम बाजूला काढून ठेविली आहे.

बशीरबाबा स्वतःसाठीं कांहीं एक स्वीकारीत नाहींत. साईबाबांच्या हेतूना पोषक असें कार्य चालविण्यासाठीं देण्यांत आलेल्या देणग्या ते स्वीकारतात व त्या त्या कार्यांत गुंतलेल्या संस्थांकडे पाठवून देतात.

बशीरबाबांचा जन्म झाला एका मुस्लीम कुटुंबांत; परंतु ते दिसतात व वागतात थेट हिंदूसारखे. ते मांस किंवा मासे यांस स्पर्शही करीत नाहींत. साधा, सात्त्विक आहार. प्रेमानें त्यांचें अंतःकरण ओतप्रोत भरलेलें आहे. त्यांचें, बाबा-प्रमाणें सर्व धर्मांवर व धर्मीयांवर सारखेंच प्रेम आहे. त्यांना साईबाबा म्हणजे श्रीरामप्रभू वाटतात. सदासर्वकाळ त्यांच्या चिंतनांत ते असतात. असे आहेत साईभक्त बशीरबाबा.

---

# ग्रंथ-परिचय

**सुबोधगीता—**

सुबोधगीताः— लेखकः— कै. शामराव विनायक देशपांडे

प्रकाशकः— वा. वि. भट, प्रमुख कार्यवाह, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,
दादर मुंबई—१४.

मानवी जीवन हें असंख्य घटनांनी भरलेलें असतें. कांही प्रसंग आनंदाचे असतात; कांही दुःखाचे असतात. कांही प्रसंग उद्वेग निर्माण करणारे असतात; तर कांही क्षोभ निर्माण करणारे असतात. कांही प्रश्न दृढतेनें सुटले जातात. कांही करावें कीं न करावें हा संभ्रम निर्माण करतात. आणि या सर्व प्रश्नांची उकल मानवी मनाला हवी असते. श्रीमत् भगवत् गीता हे

मानवाला मिळालेलें वरदान आहे. लोकमान्य टिळकांना होमरूलची चळवळ उभारून सहाय्य करणारी थोर आयरिश विदुषी श्रीमती ॲनी बेझंट यानीं गीतेचा अनुवाद इंग्रजींत करून तें धन जगभर पांखरून टाकलें.

भारतीय युद्ध सुरू होण्याच्या अगोदर थोर सारथी भगवान श्रीकृष्ण व अत्यंत निपुण धनुर्धारी रथांत आरूढ झालेला अर्जुन यांच्यांत संवाद झाला. हा संवाद म्हणजे सर्व उपनिषदांचें सार होय. परम गुरू व्यासांनी हा संवाद संस्कृतमध्यें ग्रथित केला आहे. संस्कृत ही अतिशय प्रगल्भ व समृद्ध भाषा आहे. पण ती अवगत होण्यास थोडी कठीण आहे. हें धन सामान्य जनांसाठी उपलब्ध करून देण्याचा पहिला प्रयत्न म्हणजे संतशिरोमणी श्रीज्ञानेश्वर महाराज यांची ज्ञानेश्वरी. लोकमान्य टिळकांनी भाष्य म्हणून गीता रहस्य लिहिलें. कै. शामराव विनायक देशपांडे यांचाही तसाच प्रयत्न वाखाणण्याजोगा आहे.

कै. शा. वि. देशपांडे हे ब्रिटिश अंमल सुरू असतांना एक थोर सरकारी अधिकारी होते. त्या काळीं विद्याव्यासंगाला बहर आलेला होता. काम आटो-पल्यावर करमणुकींत व्यर्थ वेळ न दवडितां वाचन–मनन करण्यांत विद्वान अधिकारी धन्यता मानीत. आणि त्याचेंच फलित म्हणजे कै. देशपांडे यांची "सुबोधगीता."

सुबोधगीता तीन विभागांत विस्तारली आहे. पहिला विभागः—विषयप्रवेश. या विभागांत गीतेचा सारांश अध्यायवार दिला आहे. या प्रतिपादन पद्धतीमुळें वाचकांचा प्रवेश गीतेच्या गूढतत्त्वज्ञानांत हळहळू होतो. आणि दुसऱ्या विभागांतील श्लोकवार अर्थ कथनामुळें गीतेचें तत्त्वज्ञान समजण्यास फार सहाय्य होतें. कै. देशपांडे यांनी सोप्या शब्दांत श्लोकांचा अर्थ दिला आहे. मूळ संस्कृत श्लोक वाचणाऱ्या वाचकांस या प्रतिपादनपद्धतीचा फार उपयोग होईल.

तिसऱ्या विभागांत – उपसंहारांत – कै. देशपांडे यांनीं विद्वान अभ्यासकाची भूमिका स्वीकारली आहे. त्यांनी गीतेच्या महत्ततेसंबंधीं आपले विचार विस्तार पूर्वक प्रगट केले आहेत. देशपांडे यांचें गीतेचें वाचन किती खोल आणि मनन किती गाढ होतें, याचा प्रत्यय वाचकांस येतो. संस्कृत न जाणणाऱ्या वाचकांस श्लोकवार अर्थकथनामुळें गीतेचा आशय नीट लक्षांत येईल.

भाषा हे मानवाच्या गरजा, मानवाच्या मनांत प्रसंगोपात्त उसळणाऱ्या भावना, आणि मानवाला स्फुरणारे विचार करण्याचे एक उत्तम माध्यम म्हणून गणलें तर संस्कृतभाषा ही अतिशय उत्तम भाषा आहे असाच अभिप्राय देणें भाग पडेल. थोड्या शब्दांत मोठा आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य ह्या भाषेंत आहे. कानाला गोड स्वर ऐकतां यावेत यासाठीं भाषेंत गेयता पाहिजे; तशी गेयता संस्कृत भाषेमध्यें आहे, आणि कोणताही विचार असो, तो स्पष्टपणें मांडण्यासाठीं भाषेंत शब्द संग्रह पाहिजे; तशी समृद्धता संस्कृत भाषेंत आहे. आमचें भाग्य हें की आमच्या प्राकृत भाषांची जननी संस्कृत भाषा आहे !

आज संस्कृत ही बोलभाषा नाहीं हें खरें, पण रामायण—महाभारतकाळीं संस्कृत ही प्रचलित भाषा होती. समृद्ध संस्कृत तत्त्वचिंतक वाङ्मय आणि संस्कृत नाट्य व कथा वाङ्मय याची साक्ष देतात. कारणपरत्वें बहुजनसमाज शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळें तो या अमोल धनाला मुकला. आणि म्हणूनच मराठी अनुवादाची आवश्यकता फारच आहे. कै. देशपांडे यांचा प्रयत्न स्तुत्य आहे.

ह्या समीक्षणाच्या सुरवातीलाच मी म्हटल्याप्रमाणें संसारी माणसासमोर अनेक प्रश्न उभे राहतात. तेव्हां त्याला मार्गदर्शनासाठी कोठे तरी वळावे लागतें. श्रीमत् भगवद्गीता हा एक असा ग्रंथ आहे कीं तो मानवाला योग्य मार्गदर्शन करूं शकतो. गीतेपुढें कृतज्ञतेनें मस्तक नमविणें हें आपलें परम कर्तव्य.

**राजराजेश्वर परशुरामः—**

राजराजेश्वर परशुरामः संकलकः— म. स. पारखे;

प्रकाशकः— ज. आ. मोंडेकर, भटवाडी, नं. २ गिरगांव मुंबई नं. ४

परशुरामभक्तांना अतिशय आवडेल असा हा ग्रंथ आहे. भगवान् परशुरामांच्या राजनैतिक कार्याचे विहंगम दर्शन श्री. म. स. पारखे यांनीं ह्या पुस्तकांत उत्तमरीतीनें घडविलें आहे. परशुरामाच्या संहाराबाबत विकल्प मानणारे लोक आहेत. ह्या संहाराबद्दल श्री. पारखे म्हणतात, “भगवान् परशुरामांनीं संहार केला तो अन्यायी क्षत्रियांचा. क्षत्रिय समाजाचे ते आजही दैवत आहेत” या संबंधींची सांगोपांग माहिती श्री. पारखे यानीं दिली आहे. ब्राह्मणांनीं राजपद

विभूषित केल्याचा पुरावा उपलब्ध नाहीं. श्री. पारखे यांनीं अपरांत निर्मितीचा इतिहास वाचकांपुढें सादर केला आहे.

भगवान् परशुरामांनीं सह्याद्रीच्या पश्चिमेकडे थेट केरळपर्यंत एक नव-वसाहत निर्माण केली; एवढेंच नव्हे तर एक आदर्श शासनव्यवस्था प्रसृत केली. शासन म्हटलें की राजनीति आली, शस्त्रसंभार आला. परशुरामांच्या नीतीचे सारसर्वस्व पुढील प्रमाणें होते.

"नास्ति जात्या रिपुर्नाम मित्रं नाम न विद्यते ।
सामर्थ्ययोगाज्जायन्ते मित्राणि रिपवस्तथा ॥ "

"कोणत्याही राजाला आणि पर्यायानें राष्ट्राला मित्र किंवा शत्रू नसतानाच. त्या राजाजवळ जेवढी संरक्षणशक्ति असेल किंवा जेवढा तो बलशाली असेल त्यावरच त्याला मित्र किंवा शत्रू निर्माण होत असतात."

शस्त्रसंभाराबाबत बोलावयाचे म्हणजे परशुरामांना किती तरी अस्त्रें अव-गत होती. नुसतें धनुष्य घेतलेत तरी त्याचा बांबू कोणत्या ऋतूंत कापलेला असावा; त्याची कांब कशी असावी, कोणती बाजू निमुळती असावी; बाण कसा असावा, त्याचा फाळ किती अणकुचीदार व किती पाणीदार असावा याचें वर्णन परशुरामांनीं केलें आणि तेंही शास्त्रोक्त व सविस्तर.

शासनाबाबत राजा कसा असावा, राणी कशी असावी, मंत्री कसे निवडावेत, प्रजेची कर्तव्यें कोणतीं याचे आदेश परशुरामांनीं दिले आहेत.

भगवान् परशुरामांनीं स्वतः राज्याचा उपभोग घेतला नाहीं. त्यांनीं राज्य मिळविलें आणि त्याचें दान कश्यपांना केलें म्हणून परशुराम राजराजेश्वर या संज्ञेस पात्र आहेत. परशुरामभक्तांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. पुस्तकाची बांधणी व छपाई उत्तम आहे.

—द. मो. चित्रे

# नीतिशास्त्राचा निकष

( डॉ. शं. दा. पेंडसे )

शुद्ध कसें बोलावें आणि लिहावें हें जसें व्याकरणशास्त्र शिकल्यानें समजतें, त्याप्रमाणें कोणतें आचरण चांगलें व कोणतें वाईट हें नीतिशास्त्र अभ्यासिल्यामुळें समजतें. पण हें नीतिशास्त्र तरी चांगल्या वाईट आचरणाचे निकष कशावरून ठरवितें? या प्रश्नाचें उत्तर भगवान श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत व ज्ञानेश्वरांनीं गीतेवरील आपल्या टीकेंत दिलें आहे.

भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायाचें नांव 'राजविद्या राजगुह्ययोग' असें आहे. गीतेच्या मध्यभागीं मेरुमण्याप्रमाणें शोभणाऱ्या या अध्यायांत भगवंतांनीं सर्वश्रेष्ठ ज्ञान आणि सर्वश्रेष्ठ रहस्य प्रकट केलें आहे आणि ज्ञानेश्वरांनी आपल्या टीकेंत हें रहस्य उलगडून दाखविलें आहे.

या अध्यायाच्या पहिल्याच श्लोकांत मनुष्याला अशुभापासून मुक्त करणारें गुह्यतम ज्ञान, विज्ञानासह सांगण्याची प्रतिज्ञा करून भगवान् म्हणतातः—

हें उत्तम आणि पवित्र ज्ञान गूढ असलें तरी प्रत्यक्ष अनुभवाला येणारें असल्यामुळें समजण्याला सुलभ आणि एकदां प्राप्त झालें म्हणजे कधींहि नष्ट न होणारें असें आहे. या ज्ञानावर ज्यांची श्रद्धा नाहीं त्यांना ईश्वराची प्राप्ति होत नाहीं. ते पुनः पुनः जन्म-मरणाच्या फेऱ्यांत सांपडतात.

ईश्वरानें आपल्या अव्यक्त अशा स्वरूपानें हें सर्व चराचर जग व्यापलें आहे. सर्व भूतें त्याच्या ठिकाणीं आहेत. पण हीं सर्व भूतें त्याच्यापेक्षां निराळीं नसल्यामुळें तो त्यांच्या ठिकाणीं आहे, किंवा तीं त्याच्या ठिकाणीं आहेत, हें आधार—आधेय भावाचें द्वैत खरें नव्हे. भूतें धारण करूनही ईश्वर भूतांच्या ठिकाणीं वेगळेपणानें नाहीं. संपूर्ण भूतजात ही त्याची कल्पना असल्यामुळें ती त्यांच्यापेक्षां भिन्न नाहीं. भूत-भौतिक जगाच्या रूपानें प्रकट होणें हाच ईश्वरी योग आहे; हीच ईश्वरी शक्ति आहे. हेंच ईश्वराचें ऐश्वर्य आहे. '**पश्य मे योगमैश्वरम्**' असें यालाच उद्देशून भगवंतांनीं म्हटलें आहे. ज्ञानेश्वर म्हणतातः— ज्या प्रमाणें दुधाचें दहीं व्हावें, बीजाचा वृक्ष व्हावा, सोन्याचा अलंकार घडावा, त्याचप्रमाणें :—

**मज एकाचा विस्तारु । तें हें जग ॥**

चिन्मय ईश्वर म्हणजेच हें जग, विश्व, किंवा सृष्टि होय. ती ईश्वरापेक्षां निराळी वस्तु नाहीं, हें सांगण्याकरितां ज्ञानेश्वर म्हणतात :—

**इये अशेषेंहि भूतें । पैं माझ्या ठायीं बिंबते । जैसें जळीं फेना ॥**

पाण्यावर जसा फेस यावा त्याप्रमाणें ही सर्व भूत-भौतिक सृष्टि ईश्वराच्या ठिकाणीं आहे.

**यापरी मी विश्वेसीं विश्वात्मा ।**

याप्रमाणें मी विश्वासह विश्वात्मा आहें. पण विश्वासह म्हटल्यामुळें ईश्वरापेक्षां विश्व वेगळें वाटेल म्हणून ज्ञानेश म्हणतात :—

**रश्मीचेनि आधारें जैसें । नव्हतेंचि मृगजळ भासे ।**
**माझ्या ठायीं भूतजात तैसें । आणि मातेंचि भावी ॥**

वस्तुतः सर्व सूर्यकिरण असतांना त्यावर जसा मृगजळाचा भास होतो, तसा मी ईश्वरच सर्वत्र असतां, माझ्या ठिकाणीं भूतभौतिक सृष्टीची भिन्नत्वानें प्रतीति होते. वस्तुतः ती मीच आहे. सूर्याहून सूर्याची प्रभा भिन्न नाहीं, तद्वत ईश्वर आणि जग भिन्न नाहीं. स्वतःची आणि जगाची ईश्वरापेक्षां भिन्नत्वानें प्रतीति न येतां ईश्वररूपानें प्रतीति येणें, हेंच सर्वश्रेष्ठ अद्वैत ज्ञान आहे.

असें ज्ञान झालेल्या दैवी प्रकृतीच्या महात्म्यांच्या भक्तीचें व कृतीचें वर्णन गीतेंत व ज्ञानेश्वरींत अनेक ठिकाणीं केलेलें आहे. असें ज्ञान ज्यांना झालेलें नाहीं, त्या आसुरी प्रकृतीच्या लोकांचे विचार व आचारही वर्णिलेले आहेत. आसुरी प्रकृतीचे लोक, हें जग केवळ आपल्या उपभोगाकरितां आहे असें समजतात. शुचितेशीं व सत्याशीं त्यांचें वैर असतें. न्याय–अन्यायाचे, पुण्य–पापाचे, चांगलें–वाईट फळ मिळतें, यावर त्यांचा विश्वास नसतो. आपल्या सामर्थ्यानें जें जें मिळेल त्याचा उपभोग घेणें, म्हणजे पुण्य व तसा उपभोग न घेतां येणें म्हणजे पाप, अशी त्यांची कल्पना असते. 'बळी तो कान पिळी' हाच न्याय ते मानतात. पापपुण्याचें बरें वाईट फळ देणारा ईश्वर किंवा परलोक दिसत नसल्यामुळें त्याचें अस्तित्व ते मानीत नाहींत. पशु–पक्षांत विवाहसंस्था नाहींत, त्यांचें काय बिघडलें आहे ? म्हणून व्यभिचार हा दोष नाहीं; चोरीचें धन विष थोडेंच होतें ! संपन्नाचे प्राण घेतले

तर त्याचें सर्वस्व हातीं येतें; म्हणून यांत पाप नसून पुण्य आहे; स्त्रीपुरुषांच्या संयोगापासून जगाची उत्पत्ति असल्यामुळें काम हाच जगाचें मूळ आहे, असें ते मानतात. क्षुद्र बुद्धीचे हे नष्टात्मे जगाला छळण्याकरितां जन्माला येतात. कधींहि तृप्ति न होणाऱ्या अनावर कामवासनेनें आणि दंभ, मान, मद, मोह इत्यादि विकारांनीं ग्रस्त झालेले हे आसुरी प्रकृतीचे लोक जगाचा धिक्कार करीत उपद्रवकारक कृत्यें करीत असतात. कामक्रोधपरायण असे हे लोक अन्यायानें अर्थसंचय करितात. स्वतःला भरपूर वैषयिक सुखें मिळतील अशा कृति करणारे हे लोक शेवटीं अधोगतीला जातात. त्यांचें जन्म व कर्म अजागलस्तनवत् व्यर्थ असतें. भौतिक सुखांच्या मागें लागलेली त्यांची बुद्धि मोहग्रस्त झाल्यामुळें त्यांचा विवेक नष्ट झालेला असतो. म्हणून त्यांचें ज्ञान, त्यांचे विचार व आचार अधोगतीला नेणारे असतात.

ज्यांना ही अधोगति टाळून उन्नतीच्या मार्गानें जावयाचें असेल, त्यांनीं चांगले आचार विचार समजून घेतले पाहिजेत. आणि त्याकरितां कार्य काय व अकार्य काय, हें सांगणाऱ्या नीतिशास्त्रालाच प्रमाण मानलें पाहिजे. पण या नीतिशास्त्राचा उगम तरी कशांतून होतो, हें सांगण्याकरितां दैवी प्रकृतीच्या महात्म्यांचें व त्यांच्या पावन आचार–विचारांचें सुंदर आणि सविस्तर चित्रण गीताग्रंथांत व ज्ञानेश्वरींत केलेलें आहे.

आपणांसह सर्व विश्व ईश्वररूप पाहाणाऱ्या, दैवी प्रकृतीच्या या महात्म्यांना दुजाभाव शिवतच नसल्यामुळें ते निर्भय असतात. आपणच आपल्याला कधीं भितों काय? वृक्ष जसा आपपरभाव न ठेवतां सर्वांना फळें, फुलें व छाया देतो, त्याप्रमाणें हे महात्मे सर्वस्वदानानें श्रांतांच्या उपयोगी पडतात. मन व इंद्रियें त्यांच्या स्वाधीन असतात. फलाशा न धरितां, अहंकाररहित होऊन ते आपलीं कर्तव्यकर्में करीत असतात. प्राणिमात्रांशीं ते सौजन्यानें वागतात. आपलें शरीर, वाणी आणि मन हीं, सर्व जग सुखी व्हावें म्हणून, ते राबवितात. त्यांचें सत्यवचन ऐकण्यास सुखकारक व परिणामकारक असतें. क्रोध त्यांनीं जिंकलेला असतो. ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान ही भेदावर आधारलेली त्रिपुटी नाहींशी झाल्यामुळें त्यांना शांति मिळालेली असते. बुडणाऱ्याविषयीं करुणा व्यक्त झालेला मनुष्य, तो अंत्यज आहे कीं ब्राह्मण आहे, तें न पहातां, त्याला वर काढतो, त्याप्रमाणें सर्वांनीं निंदिलेल्या लोकांना सहाय्य करून,

त्यांना सलणारीं शल्यें, हे महात्मे काढून टाकतात. कोणाचेंहि वर्म न काढतां पतितांना उभे करून उन्नतीच्या मार्गाला लावतात. दुसऱ्यांच्या दुःखानें दुःखी व दुसऱ्यांच्या सुखानें ते सुखी होतात. ऐहिक किंवा पारलौकिक सुखाविषयीं ते निरिच्छ असतात. भूतमात्रांशीं त्यांचें वागणें मृदु असतें. एवढेंच नव्हे तर ते जगाच्या जीवानेंच जगत असतात. त्यांना स्वतःचें स्वतंत्र अस्तित्वच नसतें. इतके ते जगाशीं एकरूप झालेले असतात. कारण आपला देह म्हणजे मी, हा भ्रम त्यांना राहिलेला नसतो. आपल्या देहाला थोंबाळणें त्यांना लज्जास्पद वाटतें. गर्व त्यांना शिवत नाहीं. कितीही दुःखें व संकटें आलीं तरी त्यांचें धैर्य विचलित होत नाहीं. ते अंतर्बाह्य शुद्ध असतात. संकटें नाहींशीं करणें व इतरांच्या सुखाकरितां रात्रंदिवस झटणें, हाच त्यांचा स्वार्थ असतो. याकरितां त्यांचा कोणी सन्मान करूं लागला तर त्यांना फार संकोच वाटतो.

**आपणचि विश्व झाला । तरी भेदभाव सहजचि गेला ।**
**म्हणोनि द्वेष ठेला । तया पुरुषा ॥**

सर्व विश्व आपण झाल्यामुळें ते कोणाचाहि द्वेष करूं शकत नाहींत. उलट अवघियाची भूतमात्रीं त्याची मैत्रीच असते.

**उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे ॥** असा प्रकार त्यांच्याजवळ नसतो. राजा व रंक त्याना सारखेच प्रिय असतात. सर्वांविषयीं त्यांना करुणा असते. हा माझा व तो परका असा भाव त्यांच्याजवळ नसतो. सर्वच त्यांचे असल्यामुळें, क्षमा हा त्यांचा स्थायीभाव असतो. सुखदुःखांनीं त्यांच्या वृत्तीची समता ढळत नाहीं. सदा संतुष्ट, संयमी व व दृढनिश्चयी अशा या भक्तांच्या हृदयांत जीव आणि परमात्मा एकासनावर विराजमान झालेले असतात. लोक त्यांना कंटाळत नाहींत. तेहि लोकांचा कंटाळा करीत नाहींत. संपूर्ण जग हा त्यांचा देह झाल्यामुळें या अद्वैतांत राग–लोभ, प्रिय–अप्रिय, भय–उद्वेग, या द्वैतमूलक भावना उरत नाहींत. स्वतः सुखरूप झाल्यामुळें त्यांना कशाचीच अपेक्षा नसते. त्यांची अंतर्बाह्य शुचिता इतकी थोर असते कीं त्यांच्यामुळें तीर्थांना पवित्रता येते. आत्मज्ञानाचा लाभ झाल्यामुळें दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीच्या प्राप्तीनें त्यांना हर्ष होत नाहीं. त्यांच्या सर्व कृती अहंकाररहित असतात. आसक्तिरहित झाल्यामुळें शत्रु-मित्र, मान-अपमान, शीतोष्ण, सुखदुःख, यांनीं त्यांची स्थिरबुद्धि विचलित होत

नाहीं. दैवी प्रकृतीच्या या ज्ञानी भक्तांच्या शुद्ध मानसांत परमेश्वराची वसति असते. झोपेंतहि ज्यांना वैराग्य सोडीत नाहीं, ज्यांच्या ईश्वरविषयक भक्ति-भावनेंत धर्माचें राज्य असतें, ज्ञानगंगेंत स्नान करून आणि पूर्णतेचें भोजन करून जे तृप्त झालेले असतात, ज्यांच्या रूपानें शांतीला नवीन पालवी आलेली असते, साक्षात् परब्रह्माला ज्यांच्या रूपानें कोंब फुटलेले असतात, धैर्यमंडपाचे जे आधारस्तंभ असतात, आनंदसागरांत बुचकळून भरलेले जे घडेच असतात, आणि विश्वात्मक परमेश्वराच्या भक्तीची ज्यांना इतकी प्रीति असते कीं कैवल्यालाहि ते ' दूर सर ' असें म्हणतात, अशा या दैवी प्रकृतीच्या ज्ञानी भक्तांची आतांपर्यंत वर्णिलेली जी सहजलीला, जे सहज घडणारे आचार, त्यांतून नीतिशास्त्र जन्माला येतें. कोणता आचार चांगला व कोणता वाईट याचा निर्णय नीतिशास्त्र या महात्म्यांच्या सहज आचारावरून करीत असतें.

ईश्वर, पापपुण्य, पुनर्जन्म इत्यादि गोष्टी सब झूट मानून केवळ स्वतःला भरपूर वैषयिक सुख देणारीं कर्में कशींही असलीं तरी चांगलीं, असें ठरविणारें आसुरी प्रवृत्तीचें नीतिशास्त्र हें शास्त्र संज्ञेलाही पात्र नाहीं. कारण त्यांत कोण-ताच विवेक नाहीं. वैषयिक सुखें स्वतःला निर्बंध मिळावीं या स्वार्थी हेतूनें कां होईना पण इतरांच्या सुखाच्या आड न येणारीं कर्में चांगलीं म्हणणें, ही नीतिशास्त्रविचाराची पहिली पायरी आहे. थोड्या लोकांच्या सुखापेक्षां पुष्कळांना पुष्कळ सुख देणारें कर्म अधिक चांगलें, ही या विचाराची पुढची पायरी आहे. पण हा अगदीं ढोबळ विचार झाला. यांत पुष्कळ लोक दुर्जन व थोडे लोक सज्जन असले, तर कोणाचें सुख अधिक महत्त्वाचें, याचा विचार नाहीं. बाह्य विषयांच्या उपभोगानें मिळणारें सुख आणि श्रेष्ठ ध्येयाकरितां केलेल्या विषयोपभोगाच्या त्यागाचें सुख, यांत अधिक चागलें कोणतें, याचाहि विचार नाहीं. भौतिक सुखें अनित्य असल्यामुळें त्यांवर आधारलेलें नीतिशास्त्रही नित्य स्वरूपाचें होत नाहीं. वैषयिक सुखें नित्य मिळणार असलीं तरीहि मनुष्य पशूचा जन्म घेण्यास तयार होत नाहीं. म्हणून शेवटीं नित्य, विषयावर अवलंबून नसणाऱ्या सुखाला श्रेष्ठ मानून, तें मिळवून देणारीं व शुद्ध बुद्धीनें केलेलीं कर्मेंच श्रेयस्कर मानावीं लागतात. कारण कर्मांचा चांगले—वाईट-पणा त्यांच्या बाह्यस्वरूपावरून ठरत नसून त्याच्या मागच्या बुद्धीवरून ठरत असतो. हें नित्य सुख भौतिक नसून आध्यात्मिक आहे. म्हणून अध्यात्म

हा श्रेष्ठ नीतिशास्त्राचा पाया आहे. आत्मज्ञानामुळें बुद्धीला येणाऱ्या प्रसन्नतेंत हें सर्वश्रेष्ठ सुख व शांति आहे. हें सुख ज्यांना मिळालें आहे अशा थोर ज्ञानी भक्तांच्या सहज आचारांत जीवंत नीति असते. त्यांच्या सहज आचारांतूनच नीतिशास्त्राचा उगम होतो. त्यांच्या आचारांच्या निकषावर नीतिशास्त्र आचारांची श्रेष्ठ—कनिष्ठता ठरवितें, हा सिद्धान्त ज्ञानेशांनीं या दोन चरणांत सांगितला आहे.

**तयांचिये लीलेमाजी। नीति जियाली दिसे॥**

**" श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रन्थकोटिभिः "**

हें जसें अद्वैत वेदांताविषयीं म्हणतात, त्याप्रमाणें नीतिशास्त्रावरील शेंकडों ग्रंथांनीं जें सांगितलें तें ज्ञानेशांनी आपल्या अलौकिक प्रतिभेनें केवळ अर्ध्या ओंवींत सांगितलें आहे.

अद्वैत ज्ञानानें विश्वाएवढें व्यापक बनून विश्वात्मक परमेश्वराची अभेदानें भक्ति करणाऱ्या दैवी प्रकृतीच्या ज्ञानी भक्तांचें गीतेंत संक्षिप्त, ज्ञानेश्वरींत सविस्तर, वर्णिलेले आचार विचार हे सर्वोत्कृष्ट व आदर्श आचार विचार होत. प्रत्येकानें या निकषावर आपले आचार विचार घासून पहावे, त्यांची पत ठरवावी आणि प्रगतीचा केवढा मोठा पल्ला आपणांस गांठावयाचा आहे, याचा अंतर्मुख होऊन प्रांजलपणें विचार करावा, हें श्रेयस्कर होय. आपणच विश्व झालों म्हणजे आपण आपल्यावर जसें प्रेम करतों, तसेंच विश्वांतील भूतमात्रावर करूं व आपले सर्व आचार प्रेममूलकच होतील. कित्येक वेळां बाह्यतः ते कठोर वाटले, तरी आईनें मुलांना त्यांच्या कल्याणाकरितां केलेल्या शिक्षेप्रमाणे ते प्रेममूलक असतात. विश्वाशीं एकरूप होऊन केलेल्या या आचाराला ज्ञानोत्तर प्रेमभक्ति म्हणतात. अद्वैत ज्ञानानें मुक्ति तर मिळतेच पण या अद्वैत ज्ञानावर स्थिर राहून विश्वात्मक देवाची भक्ति करण्यांत दैवी प्रकृतीच्या महात्म्यांना आनंद वाटतो. सहज घडणाऱ्या सर्वभूतहितकारक अशा ज्या कर्मकुसुमांनीं ते ही प्रेममूलक भक्ति करतात, त्या कर्मांचा मागोवा घेत नीतिशास्त्रें कार्याकार्याचें विवेचन करीत असतात, असा ज्ञानेशांच्या सिद्धान्ताचा आशय आहे.

———×———

# परमसिद्ध श्रीसाईबाबा

[ लेखकः- **स्वामी मुक्तानन्द परमहंस, गणेशपुरी.** ]

वस्तुतः शिरडीच्या साईबाबांविषयीं लिहिणें फार अवघड आहे. त्यांची योग्यताफार मोठी होती. ते एक महान् अवतारी सिद्ध महात्मे होते. त्यांच्या स्थितीची कल्पना शब्दांनीं काय वर्णावी ?

श्रीतुकाराम महाराजांनीं सुद्धां ह्या बाबतींत सरळ उत्तर न देतां दृष्टांत-रूपानें असें सांगितलें आहे कीं,

> **" पाण्यामध्यें मासा, झोप घेतो कैसा ? ।**
> **जावें त्याच्या वंशा, तेव्हां कळे "** ॥

ज्या पाण्यामध्यें इतर प्राणी गुदमरून मरून जातात, त्या पाण्यांत मासा रहात असतो, विहार करीत असतो पण तो कसा रहातो व त्याचा काय अनुभव आहे हें समजून घ्यावयाचें असल्यास मासा व्हावें लागेल. मासा होऊन पाण्यांत उतरूं, तेव्हांच ती गोष्ट आपल्याला कळूं शकेल.

याच सिद्धांतानुसार सिद्धपुरुषांविषयीं कांहीं लिहिणें वा बोलणें ही सोपी गोष्ट नाहीं. 'शिवसूत्र' नामक एक दिव्य ग्रंथ आहे. स्वतः भगवान् शंकरांनीं हा ग्रंथ लिहिला आहे. '**सिद्धः स्वतंत्रभावः**' असें त्यांत एक सूत्र आहे. याचा अर्थ असा कीं, :—ज्याची परतंत्रता समूळ नष्ट झालेली आहे, परतंत्रतेचें दुःस्वप्न जो कधीं पहात नाहीं किंवा, परतंत्रतेचा ज्याला कधीं स्वप्नांतही स्पर्श होत नाहीं, तो सिद्ध समजावा.

या बाबतींत सिद्धारूढ स्वामींच्या एका गोष्टीची मला आठवण होते. त्यांच्या दरबारांत अनेक लोक आपलीं दुःखें घेऊन येत असत. भक्तीच्या आनंदानें

नाचणाऱ्यांबरोबरच दुःखानें रडणारेहि येत. परंतु या दोघांहीकडे पहाण्याची स्वामींची दृष्टी एकच होती. त्यांच्या बाबतींत सुख आणि दुःख हीं दोन्हीहि स्वप्नतुल्यच होतीं. नव्हे स्वप्नेंच होतीं. परमानन्द परमात्म्याच्या व्यवहारांत कसलं दुःख ? अशा प्रकारें ज्याच्या बाबतींत परतंत्रता समूळ नष्ट झाली, व परम स्वतंत्रभावाचा उदय झाला–त्याचें नांव सिद्ध ! आणि म्हणून भगवान् शंकरांनीं "**सिद्धः स्वतंत्रभावः**" असें त्यांचें सूत्रबद्ध वर्णन केलें आहे. मात्र 'स्वतंत्रता' म्हणजे 'स्वच्छन्दता' असा मात्र कोणी अर्थ लावूं नये.

तसें पाहिलें तर आज बरेच लोक 'स्वच्छन्द' दिसतात. अर्थहीन, रुचिहीन, नीतिहीन, मर्यादाहीन अशा या लोकांपासून जगाला कांहीं बोध प्राप्त होणें दूरच, उलट बाधा मात्र होते. अशी स्वच्छन्दता ही जिवाची एक हीनदशा आहे. उलट, 'स्वतंत्रता' ही जीवाची एक दिव्य दशा आहे ! सामान्यतः यावन्मात्र जीव हर क्षणीं चौवीस तास म्हणा, बारा महिने म्हणा, अथवा आयुष्यभर म्हणा, परतंत्रच असतो. आपल्या देशांतून परदेशाला गेलेला मनुष्य जसा परतंत्र बनतो तद्वत् शिवदशेंतून जीवदशेंत उतरल्यावर परतंत्रताच नशिबीं येते. मनुष्य आपल्या स्थानीं व स्वदेशांतच स्वतंत्र राहूं शकतो. विदेशांत मानसन्मानांत राहून–ही तो परतंत्रच रहातो. आणि त्या ठिकाणीं तो परम सुखरूप राहूं शकत नाहीं. त्या प्रमाणेंच जो जीवात्मा आपल्या निजात्मस्थितीचा त्याग करून जीवदशेंत इतस्ततः भटकत रहतो, तो 'स्वतंत्र' कसा असेल ? अशी ही जीवदशा समूळ नष्ट होते. त्या स्थितीचें नांव 'स्वतंत्रभाव' आणि तो ज्यांना प्राप्त झाला ते सिद्धपुरुष.

असे हे सिद्धपुरुष जगताचे परम मित्र, परम हितचिन्तक, व गुरुजन असतात. ते जणूं कांहीं आपले मातापिताच होत. त्यांच्या आचारविचारांचें आपण अनुकरण केलें तर आपण सुद्धां त्यांच्या शुद्ध सुखाचे भागीदार होऊं शकतों.

जेव्हां एकादा मनुष्य सिद्धावस्थेला पोहोंचतो, तेव्हां तो ईश्वरासमान बनतो; आणि तो ईश्वरतुल्य झाल्यामुळें पूजनीय होतो. जगांतील ज्या विषयांचें चिंतन करावें, त्या प्रमाणें मनुष्य बनतो. त्यामुळें त्या विषयाच्या किंवा वस्तूच्या योग्यतेप्रमाणें चिंतकाला सुख किंवा दुःख प्राप्त होतें, या न्यायानें जो सिद्ध पुरुषाला शरण जातो त्याची पूजा–अर्चा करतो, अंतःकरणापासून त्या सिद्ध

पुरुषाचा सन्मान करतो. स्वतःचें संपूर्ण व्यक्तित्व व अस्तित्व त्या सिद्ध-पुरुषामध्यें समर्पित करतो, तो स्वतःच सिद्ध बनतो.

यासाठीं सिद्धपूजा ही सर्वश्रेष्ठ उपासना मानली आहे. परन्तु ही पूजा एक रूढी मात्र होतां कामा नये. मन कुठें तरी भटकत ठेवून केवळ बाप-दादांच्या भीतीनें त्रिकाळ संध्येची कवाईत करणें किंवा रस्त्यानें जातां जातां इतर दृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेतांनाच अनायासें मंदिर दिसलें तर तिथल्या देवाला पण एक नमस्कार ठोकून जाणें,अशानें सत्यफलप्राप्ति कदापि होत नाहीं.

वस्तुतः वेदान्त तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें मनुष्य मात्र एक उच्च, दिव्य व महान् आत्मा आहे. परंतु त्या आत्मतत्त्वाचें माणसाला ज्ञान नसल्यामुळें परस्पर वैर, जातीजातींत शत्रुता, देशादेशांमध्यें दुश्मनी, अधिकाऱ्यां–अधिकाऱ्यांमध्यें दुष्ट स्पर्धा, शेतकऱ्यां–शेतकऱ्यांमध्यें भांडणतंटे, आणि सत्ताधाऱ्यांमध्यें वैमनस्य दिसून येतें. अशी ही दुर्दशा पाहून समंजस माणसाला अतिशय वाईट वाटतें.

फार पूर्वीं मोठमोठीं कुटुंबें अस्तित्वांत असत. अशा संयुक्त कुटुंबांमध्यें एका वेळीं २००, ३००, ४०० वा ५०० माणसें सुद्धां रहात असत. आज अशीं मोठीं कुटुंबें क्वचित कुठें आढळून येतात. अशाच एका संयुक्त कुटुंबाचें नुकतेंच विभाजन झालें. त्यामध्यें ३६० माणसें होतीं. अशा मोठ्या कुटुंबांतील वृद्ध पितामहाचें सर्वांवर समान प्रेम असे आणि कुटुंबांतील लहान मुलें आपसांत मारपीट करतांना, परस्पर द्वेष करतांना, पाहून त्या पितामहांना अतिशय दुःख होत असे. परंतु मार देणारे व खाणारे हे दोघेही त्यांच्या दृष्टीनें सारखेच जवळचे वाटत. मला वाटतें, सध्यांची आपली परिस्थिती पाहून त्या जगताच्या पितामहाला देखील असेंच वाटत असेल.

ज्या परमात्म्याचे आपण अंश आहोंत—ज्या परमात्म्यापासून आपला उदय झाला आहे, तो परमात्मा आपल्याला वरून पहात आहे. आपले पक्षोप-पक्ष, आपलें राजकारण, आपला परस्पर द्वेष, आपली दुष्टता, नीचता, परस्पर कटुता, ह्या गोष्टींना पाहून तो परमात्मा दुःखी होत असला पाहिजे. अशा प्रकारच्या विषमतेचा नाश करण्यासाठीं व समतेची स्थापना करण्यासाठीं श्रीसाईबाबांसारख्या सिद्धपुरुषांच्या रूपानें तो परमात्मा अवतरत असला पाहिजे.

योग, साधन, भक्तियोग व वेदांताचें आचरण इत्यादि शास्त्रीय साधन-प्रक्रिया पुष्कळ आहेत. ह्या साधनमार्गांनीही दिव्य-सिद्धस्थिती प्राप्त करतां येते.

परंतु त्याहीपेक्षां सोपा मार्ग म्हणजे सिद्धाश्रय. एकाद्या सिद्धपुरुषाच्या कृपेनें सहज प्राप्त होणारी सिद्धस्थिती सर्वोत्तम मानली जाते. योगशिवोपनिषदांत म्हटलें आहे—

**नानामार्गैस्तु दुष्प्राप्यं कैवल्यं परमं पदम् ।**
**सिद्धिमार्गेण लभते नान्यथा पद्मसंभव ! ॥**

इतर अनेक मार्गांनीं प्राप्त होण्यास कठिण असें कैवल्यपद हे ब्रह्मदेवा ! सिद्धमार्गानें सहज प्राप्त होऊं शकतें. इतर मार्गांनीं नाहीं.

सिद्धपुरुषांचे अनेक प्रकार आहेत; परंतु त्या सर्वांची स्थिती व गति एकच असते. हे प्रकार असेः—जन्मसिद्ध, मंत्रसिद्ध, साधनसिद्ध, कृपासिद्ध, आणि कांहीं विशेष कार्यासाठीं अवनीतलावर येणारे ईश्वराचे प्रेषित सिद्ध. श्रीसाईबाबा हे अशा सिद्धपुरुषांमध्यें अग्रणी होत. त्यांना जीवत्व नव्हतें. कोणत्याही प्रकारचा भेदाभेद नव्हता. सर्व प्राणिमात्र त्यांना समान होते. त्यामुळें श्रीसाईबाबांनीं आपल्या जीवनकालामध्यें व समाधीनंतरही असंख्य लोकांचें कल्याण केलें आहे.

मनुष्यामध्यें एक महान् शक्ति वास करीत असते; पण ज्या वेळीं तो पूर्ण मनुष्य होईल त्यावेळीं तिचा साक्षात्कार होत असतो. मनुष्यानें जों पर्यंत पूर्ण मनुष्यस्थिती प्राप्त केलेली नसते, तों पर्यंतच तो शक्तिहीन दिसतो. शिवसिद्धांताप्रमाणें "**अयं शक्ति–दरिद्रः संसारी उच्यते ।**" जों पर्यंत मनुष्य अशा तऱ्हेनें शक्तिहीन असतो, तों पर्यंत तो दरिद्री, व सांसारिक प्रवृत्तींचा गुलाम असतो. मी अल्पज्ञ जीव, अमक्याचा मुलगा, तमक्याचा आश्रित, दुसऱ्यांच्या आधारावर जगणारा, अशा कमकुवत विचारांच्या जाळ्यांत तो गुरफटून राहतो. अशा स्थितींत जो मनुष्य आपलें स्वतःचेंच कल्याण करूं शकत नाहीं, तो दुसऱ्यांचें कल्याण काय करणार ? अशा माणसांनीं लोककल्याणाचा आव आणला तरी ते केवळ लेक्चरबाज असतात. अशा लेक्चरबाजीनें ते कोणाचेंही कल्याण करूं शकत नाहींत. दुसऱ्यांचें कल्याण करण्याचें केवळ नाटक मात्र करीत असतात. मी ह्यांचें कल्याण करीन, त्यांचें कल्याण करीन, मी हें करीन, तें करीन, अशा प्रकारच्या अहंकारानें भारलेले हे लोक स्वतःच रोगी आणि अपूर्ण असतांना, दुसऱ्यांचें कल्याण करण्याच्या घोषणा करतात. हा केवढा विनोद.

जेव्हां मनुष्य आपल्या शक्तिदरिद्रतेचा नाश करून शक्तिविकास साधतो तेव्हां स्वशक्तीच्या विकासानें तो सिद्ध बनतो. "**शक्तिविकासत् शिव एव हि**" अशी शिवसूत्राची ग्वाही आहे. श्रीसाईबाबा अशा प्रकारचे पूर्ण सिद्ध होते. अशा सिद्धांना व्यक्तित्व, ज्ञाती, पंथ, देश, वगैरे नसतात. ते संपूर्ण मानवतेचे असतात. श्रीसाईबाबांना सर्व समान होते. त्यांच्या जवळ जें कांहीं होतें, तें प्रसादरूपानें ते सर्वांना सारखे देत असत.

त्यांच्यामध्यें मरणशीलता नव्हतीच. शरीरत्याग केल्यावर सुद्धां सूक्ष्म शरीरांत राहून अप्रत्यक्षपणें पुष्कळकाळ पर्यंत चिरजीवन व्यतीत करूं शकण्याचें सामर्थ्य त्यांचेपाशीं असल्यामुळें त्यांना न पाहिलेले लोक देखील शिरडीला जाऊन आपलें इच्छितफळ प्राप्त करीत असतात. ह्या बाबतींत संदेह करण्यासारखें कांहीं नाहीं. कारण ज्यानें आपल्या जीवित्वाला ईशत्वामध्यें विलीन करून जो स्वतः ईशस्वरूप झाला तोच सिद्ध.

**विश्व मटिया-मेट कर जो, आप भी है मिट गया।**
**सो जी गया जी जी गया, मर भी अमर ही हो गया।**

ज्यानें स्वतःला ईशत्वांत मिळवून टाकलें, व अशा प्रकारें जो ईश्वरस्वरूप बनला तो सदैव अमर आहे. जोंपर्यंत सूर्यचंद्र आहेत तोंपर्यंत श्रीसाईबाबा आहेत. म्हणून शिरडी क्षेत्रांत आजसुद्धां पुष्कळ लोकांचें दुःख दूर होत असतें. भारताच्या कानाकोपऱ्यांत नव्हे तर इंग्लंड, अमेरिका, आफ्रिका इत्यादि देशांत सुद्धा त्यांचे असंख्य भक्त दिसून येतात. ज्यांचा देह जीवित अवस्थेंत सर्वांच्या दुःख निवृत्तीसाठीं, सर्वांचें कल्याण करण्यासाठीं, सर्वांच्या कामीं उपयोगी पडण्यासाठीं असतो, तोच देह ईश-देह असतो.

अशा प्रकारच्या दिव्य, महान् व्यक्ति जगांत मधून मधून अवतरित होत असतात. भगवान् श्रीनित्यानंद असेच एक सिद्ध पुरुष होते. आजहि अशा प्रकारच्या व्यक्ति हयात आहेत. त्यांपैकीं श्रीरणछोडबापू हे एक आहेत बिहारच्या दुष्काळांत त्यांनीं फार मोठी कामगिरी केली. आतां गुजराथच्या भीषण संकटकाळामध्यें निरनिराळ्या पूरग्रस्त विभागांत जाऊन दिव्य व भव्य असें कार्य करीत आहेत. नारेश्वर येथील श्रीरंगावधूत महाराज असेच एक सिद्ध पुरुष आहेत. जगावरील संकटाचा भार हलका करण्यासाठीं अशा सिद्ध

पुरुषांचा अवतार होत असतो. अशा सिद्ध पुरुषांपासून स्वतंत्रता व आध्यात्मिक सुखाची प्राप्ति होते. सर्वांमध्यें एकाच आत्म्याची ज्योति विराजमान आहे, असा अनुभव मिळतो. अशा प्रकारचा आत्मानुभव देण्यासाठींच सिद्धपुरुषांचा मुख्यतः अवतार असतो. परंतु सामान्यलोक त्यांची केवळ बाह्य पूजा करण्यांत आपलें इतिकर्तव्य समजतात. कोणी म्हणतो ' रामायण ' वाचून टाकलें, कोणी म्हणतो भागवत वाचून टाकलें. कोणी म्हणतो व्रजेश्वरीला गेलों होतों, अनायासें नित्यानंद स्वामींचें पण दर्शन घेऊन टाकलें. हें ऐकल्यावर वाटतें रामायण, आणि भागवत या काय वाचून 'टाकायच्या' गोष्टी ? त्यांतून कांहीं बोध ग्रहण केला तर उपयोग. खरी खुरी सुखप्राप्ती तरी होईल. त्या प्रमाणेंच सिद्ध महात्म्याचें बाह्यपूजा दर्शन घेत, आणि बाह्यपूजा करून टाकली असें होऊं नये. भक्तीनें, प्रेमानें त्यांच्या अंतरंगांत प्रवेश करून आपलें अंतःसुख मिळविलें तरच उपयोग.

मी ३० वर्षांपूर्वीं गोदावरी नदीच्या तीरावर शिरडी नजीक कोकमठाण या गांवीं जवळ जवळ १२ वर्षें राहिलों. त्यामुळें श्रीसाईबाबांचें चरित्र आणि कार्य यांच्याशीं माझा निकट संबंध आला. मला त्यांचेविषयीं अपार प्रेमभावना आहे. आणि माझे सद्गुरु भगवान श्रीनित्यानंद यांच्यासमान मी त्यांना मानतों. किंवा गणेशपुरीला आल्यानंतर श्रीनित्यानंद स्वरूपांत मला श्रीसाईबाबाच भेटले असें म्हटलें तरी चालेल.

काया, वाचा, मनें करून ज्यावेळीं एकादा मनुष्य अशा सिद्धपुरुषांची पूजा करतो, त्याच क्षणीं तो शांतीचा उपभोग घेऊं लागतो. आपण श्रीसाईबाबांचा केवळ उत्सव साजरा करून आपलें इतिकर्तव्य झालें असें समजू नका. त्या महान् सिद्धपुरुषाच्या दिव्य जीवनापासून कांहीं बोधग्रहण करून आपल्या जीवत्वाला शिवत्वाचा उजाळा द्याल, तेव्हांच त्यांचा उत्सव साजरा करण्याचें खरें सार्थक होईल. अस्तु.

अशा दिव्य सिद्ध पुरुषाविषयीं अधिक काय काय बोलावें ? ते केवळ कामधेनु, कल्पवृक्ष व संजीवनीतुल्य, सीमारहित, शक्तिपूर्ण, ईशपूर्ण व सर्वथा संपूर्ण आहेत. त्यांना आत्मभावानें वारंवार वंदन करूंया.

" सद्गुरु साईनाथ महाराज की जय. "

# सर्वव्यापी अध्यात्म

—डॉ. मो. दि. पराडकर
M. A. Ph. D, मुंबई

अध्यात्म हें एका अर्थी आज सर्वव्यापी होऊन बसलेलें आहे. जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रांत त्याचा प्रभाव वा अभाव प्रकर्षानें जाणवतो.

अध्यात्म म्हणजे संसाराकडे, ऐहिक उत्कर्षाकडे, पाठ फिरवणें अशी एक समजूत होऊन बसली आहे. कांहीं कारणानें गाडी अडली तर तंत्रज्ञाला बोलावून आणण्याऐवजीं 'देवाजीच्या मनांत असलें' तर गाडी चालू होईल असें मानून स्वस्थ बसणें हें अध्यात्माचें लक्षण नाहीं. खरें अध्यात्म निवळ शंकराच्या आराधनेंत नाहीं, विष्णूच्या पूजेंतही नाहीं, आणि ब्रह्मदेवाच्या भक्तींतही नाहीं. अध्यात्म हें माणसाच्या मनोवृत्तींत असतें. त्याचा वयाशींही संबंध जोडण्याचें कारण नाही. अध्यात्माचा संबंध तत्वज्ञानाशीं आहे व तत्वज्ञान हें व्यवहारांतून जन्माला आलेलें असतें. ज्या तत्त्वज्ञानाचा व्यवहाराला उपयोग होत नाहीं तें तत्त्वज्ञान कोरडें ठरतें. तत्त्वज्ञान व व्यवहार विचार आणि आचार यांची फारकत केल्यामुळें आमच्या समाजाच्या जीवनाला कणा राहिलेला नाहीं. आज ज्या भ्रामक समजुतींचा पगडा आमच्या मनावर पडलेला दिसतो त्याचेंही कारण हेंच होय.

अध्यात्म हें मनाच्या विकसित अवस्थेचें लक्षण आहे. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या न्यायानुसार जगांत निरनिराळ्या प्रकारचे लोक आढळतात. कांही निव्वळ स्वतःसाठींच जगत असतात; त्यांना स्वार्थापलीकडे कांही दिसत नाहीं; कशाचीही मातब्बरी वाटत नाहीं. अशा व्यक्तींच्या बाबतींत संस्कृत सुभाषितकारानें—

'ते पृथिव्यां भुवि भारभूताः मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति'

असें म्हणून ठेवलेलें असावें. या उलट कांहीं लोक स्वतःच्या कुटुंबाच्या कल्याणासाठीं आयुष्याचा कण न् कण वेंचीत असतात. कुटुंबाचा उत्कर्ष हेंच त्यांचें सर्वस्व. त्यासाठीं कितीही श्रम करण्यांत, कोठलाही त्याग करण्यांत,ते कसूर करीत नाहींत. या लोकांचें मन केवळ स्वतःपुरताच विचार करीत नाहीं व या अर्थानें तें थोडें विकासित झालेलें असतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. याच्या पुढची पायरी म्हणजे कुटुंबापुरतेंच मर्यादित न राहतां जमातीसाठीं किंवा जातीसाठीं कष्ट करण्यास तयार असणें ही होय. या लोकांचा 'स्व' भाव अधिक व्यापक असतो. या अवस्थेच्याही पलीकडे जाणारे लोक समाजाच्या हिता-हिताची चिंता बाळगणारे असतात. निव्वळ जातीपुरता, जमातीपुरता, विचार करणें यांच्या मनाला पटत नाहीं. समाजाच्या हितापेक्षांही ज्या देशांत जन्म घेतला त्या देशाचा रास्त अभिमान बाळगून त्याच्या उत्कर्षासाठीं अहोरात्र झटणाऱ्या लोकांनीच राष्ट्राला, राष्ट्राच्या इतिहासाला, प्रतिष्ठा मिळवून दिलेली आहे. या लोकांचें मन अधिक व्यापक भूमीवर अधिष्ठित झालेलें असतें. यामुळेंच या व्यक्तींचाही गौरव होतो. परंतु कांहीं लोकांचें मन देशाच्या भौगोलिक सीमा ओलांडून संपूर्ण मानवतेच्या हिताला गवसणी घालूं पाहतें. हे लोक खऱ्या अर्थानें विश्वाचे नागरिक असतात. त्यांचें प्रेम मानवजातीवर असतें.

"स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमान् एकः सतां अग्रणी"

हें भर्तृहरीचें वचन सर्वार्थानें यांना लागू पडतें. स्वतःपुरता, जमातीपुरता, समाजापुरता किंवा देशापुरता विचार करणें यांना जमत नाहीं. सम्पूर्ण मानव-जातीचे हित हाच यांच्या विचाराचा व आचाराचा मानदण्ड ठरतो.

या सर्व अध्यात्माच्याच पायऱ्या आहेत. यांत 'सर्वः स्वार्थं समीहते' हा सिद्धांत आचरणांत आणणाऱ्यापासून, 'जे कां रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले' असें मानणाऱ्या साधूंचाही अंतर्भाव होतो. संपूर्ण मानवतेचें हिताहित डोळ्यांपुढें ठेऊन वागणारा माणूस हाच शंभरटक्के अध्यात्मवादी. देशप्रेम, समाजाचा अभिमान, स्वतःच्या जातीबद्दलचा अभिमान ही उतरती परंपरा. राजकारण राजकारण म्हणून जे म्हणतात, त्यांतही प्रगती करून घ्यावयाची असल्यास अध्यात्मवृत्तीचा उपयोग हमखास होतो. तात्कालिक यशानें हुरळून जाणें आणि तात्पुरत्या अपयशामुळें खचून न जाणें या दोन्ही गोष्टी अहंकाराला

महत्त्व दिल्यामुळें संभवतात. हा अहंकाराचा आविष्कार जितका कमी होत जाईल तितक्या प्रमाणांत मनुष्य 'तत्त्वनिष्ठ' म्हणजे राजकारणी व पर्यायानें अध्यात्मवादी मानावा लागेल. अध्यात्म हें मनाचें सामर्थ्य आहे; मनोविकासाचें गमक आहे. 'मी चोखाळलेला मार्ग समाज्याच्या, देशाच्या किंवा मानवाच्या दृष्टीनें हितावह ठरणार आहे' ही दृढ श्रद्धा असल्याशिवाय खरा निर्भयपणा, येणार नाहीं, सिद्धान्ताला चिकटून रहाण्याची जिद्द निर्माण होणार नाहीं निष्ठेनें कुठलें कार्य तडीस नेतां येणार नाहीं. नेपोलियनसारखा अव्वल दर्जाचा सेनानीसुद्धां म्हणे कीं पराभव सोसलेल्या सेनानीवर माझा अधिक विश्वास आहे. यांतलें गम्य दुसरें काय असणार ? एवढ्या तेवढ्या अडचणीमुळें किंवा कार्यांतील विघ्नांमुळें निराश न होतां, धीर न सोडतां, प्रयत्नांचा जोर पूर्ववत् ठेवणें हें सर्वांना सहजासहजीं साधणारें नाहीं.

राजकारण किंवा रणांगण ह्यापेक्षां समाजकारण, शिक्षणक्षेत्र, फार काय नित्याची रुग्णापरिचर्या यांत अशा आध्यात्मिक वृत्तीचा प्रभाव आपणांस दिसून येतो. डॉक्टरांची किंवा परिचारकांची वृत्ति अशी अध्यात्मानें शुद्ध झालेली नसेल तर किती तरी रोग्यांना अकालीं मृत्युलोकास जावें लागेल. विनोदाच्या भरांत वैद्यराजांना 'यमराजसहोदर' म्हणणें निराळें. प्रत्यक्ष मृत्यूशीं जणूं काय टक्कर देऊन रोग्यावर उपचार चालू ठेवणारा डॉक्टर; शस्त्रक्रिया केल्यावर इष्ट परिणामाची आतुरतेनें वाट पहाणारे वैद्यराज या उभयतांच्या अंगीं अध्यात्म पुरा बाणलेला असतो. कदाचित् त्यांना त्या अध्यत्मवृत्तीचें भानही नसावें. कुलपरंपरा, पेशाची प्रतिष्ठा, व्यवसायाचें पावित्र्य, इत्यादि सर्व गुणांचा परिपोष (व्यवसाय कोणता कां असेना) आध्यात्मिक प्रभावावांचून साधणार नाहीं.

महात्मा गांधींचें उदाहरण सध्याच्या शताब्दि उत्सवामुळें अत्यंत प्रासंगिक आहे. महात्मा गांधींना काय म्हणावें ? ते राजकारणी पुढारी होते, का महात्मा होते, का ? एक आध्यात्मिक संत होते ? अथवा सामाजिक सेवेचें व्रत घेतलेले सुधारक म्हणावेत ? ग्रामसुधारणेचें वेड असलेले अवलिया, असे कुणी त्यांना म्हणत. भंगी, हरिजन, बहिष्कृत जमाती इत्यादिकांचा कैवार व्यापक राष्ट्रीय प्रमाणावर महात्माजींनीं घेतला तसा इतर कुणालाही घेतां आला नाहीं.

प्रभावी ब्रिटिश साम्राज्याचा हा एक चिमुकला कैदी तुरुंगांत राहून साप्ताहिक चालविण्याची परवानगी मिळवितो आणि देशभर आंदोलन माजवितो तरीही कैदी म्हणून मिरवितो, हा प्रकार अगदीं अनाकलनीय आहे. महात्माजींचीं विविध अंगें लक्षांत घेतां ते भारी समाजसेवक, शिक्षणसुधारक, दलितोद्धारक, ब्रिटिश विरोधी चळवळ्ये इत्यादि सर्व राहूनही महात्मा म्हणून ते जगभर मिरविले, ह्यांत महात्माजींच्या अध्यात्माचे किंवा आध्यात्मिक वृत्तीचें फार मोठें यश आहे. असा अध्यात्मिक मनुष्य अजून दुसरा कोणी झालाच नाहीं, ही वाणी सत्य होय. सबंध देशभर गोंधळ माजला असतां उपसलेली तलवार मुकाट्यानें म्यान करावयास लावणारा हा महावीर आध्यात्मिक शक्तीचा हिमालयच होता. सर्व देशभरांत एकट्याचा आवाज उठविण्याची हिम्मत, तमाम लोकमतांना विरोध करण्याची छाती आणि ‘हिमालयाएवढी माझी चूक झाली’ म्हणून क्षमा मागण्याची तयारी ह्या सगळ्या कृत्यांत आध्यात्माचा हिमालय दिसतो.

गोखल्यांचें व्रत पुढें चालवून महात्माजींनीं राजकारणाला अध्यात्माचा उजाळा दिला. भारतसेवक समाजाच्या मनोधारणेंतील भाग गांधींनीं पूर्णपणें आत्मसात केला आणि आपल्या आदर्श उदाहरणानें प्रसंगीं अखंडित लिहीत राहून व्याख्यानें देऊन हें तत्त्व भारतीयांच्या गळीं उतरविण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला. एरव्ही राजकीय पुढारी प्रत्येक देशांत आणि प्रत्येक पिढींत जन्मतात. महात्मा गांधींच्या मृत्यूनें दुनियेला हळहळ वाटली याचें कारण महात्माजींचें सर्वव्यापी सर्वशक्तिमान आणि सार्वकालीन अध्यात्म. संयुक्त राष्ट्रसभेचे झेंडे देखील त्या दिवशीं शोकावेगानें अर्धनत झाले.

महात्मा गांधींना अहमदाबादेस शिक्षा झाली. तेव्हां न्यायाधीशांनीं म्हटलें, लोकमान्यांच्या शिक्षेसारखीच ही शिक्षा होय. महात्माजी ताबडतोब उत्तरले: त्या थोर लोकमान्यांच्या नांवाशीं मला निगडित होतां आलें हें माझें महत्तर भाग्य होय! हा देखील आध्यात्मिक सामर्थ्याचाच पुरावा आहे.

राजकारणांतील कर्तबगारी आध्यात्मिक सामर्थ्याची जोड मिळाल्यामुळें कशी नेत्रदीपक ठरते याचें एक उत्तम उदाहरण म्हणजे लोकमान्य टिळकांचें जीवन होय. राजद्रोहाची शिक्षा झाल्यानंतरही न्यायालयांत “मी जरी आज

दोषी ठरलों असलों तरी येथील न्यायालयाच्या शक्तीपलिकडे एक स्वतंत्र शक्ती अस्तित्वांत आहे व तिच्यापुढें मी पूर्णपणें निर्दोषीच ठरेन अशी मला खात्री आहे," असे धीरगंभीर उद्गार लोकमान्यांनीं काढले, ते आध्यात्मिक सामर्थ्याच्या जोरावरच.

महात्मा गांधींची सत्याग्रहांची चळवळ, आचार्य विनोबा भावे यांची भूदान मोहिम, "ऑलिंपिक" धर्तीवरचे राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय क्रीडोत्सव, विविध विषयां-संबंधीं अभ्यासात्मक परिषदा ...समाजसेवेची महिलांनी सांभाळलेली निरनिराळी अंगें, बालवीर चळवळ ...ह्या सर्वांना अध्यात्माचें अधिष्ठान आहे. सर्व मोठमोठे नोकर; ...छोटे मोठे मास्तर.... धीमंत, तत्वज्ञ, व्यापारी, उद्योग, वाहतूक, सरकारी वा बिनसरकारी कार्यकर्ते; यांपैकीं ज्यांच्यावर अध्यात्माचा पगडा अधिक होता, ते यशस्वी ठरले. देशभर, जगभर त्यांचा गौरव झाला. आपणही त्यांचें कौतुक केलें.

महात्माजींबद्दल तर बोलावयासच नको; अध्यात्माखेरीज जगणें त्यांना अशक्य वाटे. पण त्यांच्या मानानें पंडित जवाहरलाल हे नवजवान. अध्यात्माचा गंध त्यांना नसावा. पण वास्तविक रसिकाग्रणी जवाहरलाल अध्यात्मवादी देखील होते. लालबहादुर शास्त्री तर अध्यात्मशाली होते. त्यांच्या मागून आलेल्या श्रीमती इंदिरा गांधी ? अध्यात्माचा अभ्यास मी केला नाहीं असें त्या म्हणाल्या– तरी आजपर्यंत त्यांच्या कर्तबगारीला अध्यात्माची भक्कम जोड दिसत आहे.

अध्यात्म हा मानवी जीवनाचा मूल आधार आहे. जीवनाच्या कुठल्याहि क्षेत्रांत स्वतःचें कर्तृत्व गाजवावयाचें असेल तर निर्भयपणा, व प्रखर ध्येयनिष्ठा हवी. हे गुण स्वार्थाला तिलाञ्जलि दिल्याशिवाय पदरीं पडत नाहींत. "नोच्चार्थो विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्ति कामो लघुः।" म्हणून उच्च आकांक्षा बाळगायची असल्यास अध्यात्मावाचून गत्यंतर नाहीं. शिक्षित मनाला सार्वदेशीय—सार्वकालीन असा उपदेश एकचः "सत्यान्नप्रमदितव्यम्–धर्मान्न प्रमदितव्यम्–स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम।" हा आचरितांना अध्यात्म आपोआप पदरीं पडेल !



# या देवाचा खेळ निराळा

लेखक : द. शं. टिपणीस

( उत्तरार्ध )

**बंधनांची जरूरी**

बंधनामुळें संघर्ष होतो हें खरें असलें तरी बंधनाशिवाय व्यक्ति व समाज यांची प्रगती व्हायची नाहीं. हेंही तितकेंच खरें आहे. समाज व राष्ट्र सुव्यवस्थित राहण्यासाठीं व्यक्तीला जशीं कायद्याची बंधनें आवश्यक आहेत तशी सामाजिक व नैतिक बंधनेंही जरूर आहेत. माणसाचें मन मोकाट सुटलें तर त्याच्या इच्छावासना व विकार हे, शेतांतून उधळत जाणारे जनावर पिकाची हानी करतें तद्वत जीवनमार्गावरून उधळत जाऊन चांगल्या जीवनमूल्याची नासाडी करतात. यास्तव बंधनें असणें जरूर अहे. अध्यात्मांतील सर्वोच्च ध्येय जें आत्मज्ञान तें साध्य होण्यासाठीं जी साधना वापरावयाची त्या साधनेंत मनानें मोकाटपणें वावरून नासधूस करूं नये म्हणून कांहीं मानसिक बंधनें असणें जरूर आहे. पण हीं बंधनें अत्यंत आवश्यक व कमीत कमी असावी. शिवाय त्यांचा त्रास तीं बंधनें पाळणाऱ्या व्यक्तीखेरीज इतरांस होऊं नये. जरूरीपेक्षा जास्त व फालतू बंधनें असली व इतरांना त्याचा त्रास व आडकाठी होत असली तर त्यातून संघर्ष निर्माण झाल्याखेरीज राहणार नाहींत. ही गोष्ट दृष्टीआड केल्यामुळें आज नव्याजुन्या पिढीमध्यें धार्मिक संघर्ष निर्माण झाले आहेत. जुन्यांनीं नव्यांना नास्तिक म्हणावे, नव्यांनीं जुन्यांना धर्मभोळे अंधश्रद्ध म्हणावे, दोघांनीं एकमेकांना हंसावे, त्यामुळें कौटुंबिक व सामाजिक एकात्मतेला तडे जावे ही गोष्ट समाजाच्या, राष्ट्राच्या व अध्यात्माच्या दृष्टीनें हानिकारक आहे. आजच्या मानवी बुद्धीची वाढ, भोंवतालची परिस्थिति व मानवाचा अपरिहार्य असा दैनंदिन जीवनक्रम यांच्याशीं मिळतीं जुळतीं अशीं धार्मिक बंधनें व्यक्तीवर असली तर अनेक

धार्मिक संघर्ष टळले जातील. हें सर्व लक्षांत घेऊन कांहीं रूढ अध्यात्मिक साधने आवश्यक म्हणून बाजूला सारून कर्मीत कमी बंधनाची शक्यांत शक्य साधी अशी साधना बाबांनीं आपल्या भक्तांना सांगितली आहे. भक्ति म्हणजे देवावरील निष्काम प्रेम. शुद्ध प्रेम हें निष्कामच असते. त्यांत देवघेवीला वाव नसतो, तें अभेद आहे. त्यांत मीतूंपणा नाहीं. मग कोण कोणाला काय देणार ? देव भक्त यांची ती एकात्मता. ही एकात्मता साधणें हें भक्तीचें ध्येय. जसा भाव तसा देव. यासाठीं भक्तानें आपला भाव ज्या योगें शुद्ध ठेवला जाईल, देवावरील निष्ठा वाढेल, देव व आपण यांतील अंतर हळू हळू कमी होत जाईल व अंतीं सर्वभूतीं ईश्वर पहाण्याची दृष्टी आपणांस प्राप्त होईल, अशी साधनें सदैव वापरावीत. भक्तीत बाहेरील देखाव्यापेक्षां अंतरंग अधिक महत्त्वाचें आहे. आपल्या अंतरभावनांकडे दुर्लक्ष करून मोठमोठ्या पूजा अर्चा करणें वा उपास तापास व्रतें करणें म्हणजे भक्तीचा व धार्मिकपणाचा नुसता डौल मिरविणें होय. दंभ आहे तो. सापाच्या तोंडांत जसा बेडूक तसा हा भक्त अहंकाराच्या तोंडात अडकलेला असतो. पूजेंत भाव नसेल, निष्ठा नसेल, दृष्टी नसेल वअहंकारा असेल तर अशा पूजा वा व्रतवैकल्ये आध्यात्मिकदृष्टच्या पूर्ण निरुपयोगी आहेत. शिवाय हल्लींच्याकाळीं असल्या गोष्टीमुळें संघर्ष होतात. एकाद्या कुटुंबांतील एकाद्या व्यक्तीचे उपवास व्रतवैकल्ये वा पूजा यांचा त्रास त्या कुटुंबांतील इतरांना होत राहिला तर संघर्ष अटळ असतो. हल्लीं घरोघरीं असे संघर्ष चालूच आहेत. ज्या योगें चित्त शुद्ध होत राहील, निष्ठा व शुद्ध प्रेम वाढीस लागेल व अहंकार कमी कमी होत जाईल अशी साधना करीत राहाल्यास पूजादी गोष्ट व इतर डामडौल न केला तर काहीं अडायचें नाहीं.हौस म्हणून खुशाल कराव्यात पण वरील सर्व पथ्यें पाळून. पूर्वीच्या सर्व संतांनीं या गोष्टी सांगितल्या आहेत. बाबांचें वैशिष्ट्य एवढेंच कीं पूजेचा बाह्य देखावा आणि मध्यस्थांची माझ्या भक्तीत जरूरी नाहीं असें आडपडदा न ठेवतां स्पष्ट व स्वच्छ शब्दात सांगितलें आहे. ते स्पष्टपणें सांगतात—

न लगे मज पूजासंभार। षोडस वा अष्टोपचार ।
जेथें भाव अपंपार। मजला थार ते ठायीं ॥

उपोषणाच्या तयारींनें आलेल्या गोखलेबाईस

काय आवश्यकता आपुल्याला । उपास तापास करावयाला ।

असें सांगून तिला उपोषणापासून त्यांनीं परावृत्त केले.

## आजची जरुरी

ज्ञानेश्वर, एकनाथ वा रामदास यांच्या वेळची समाज व राष्ट्रपरिस्थिति व व्यक्तीची उंची आणि विसाव्या शतकांतील परिस्थिति व व्यक्तीची बुद्धीमत्ता यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे. त्यावेळच्या अध्यात्मिक पद्धति आज जशाच्या तशा अनुसरणें योग्य व हितकारी होईलच असें नाहीं. दहा वर्षाच्या मुलाचा अंगरखा पंचवीस वर्षे तरुणाच्या अंगांत बसण्याचा खटाटोप करण्यांत अर्थ नाहीं. दैनंदिन व्यवहारास जमेल व सर्व प्रकारचे संघर्ष शक्यांत शक्य कमी करील अशी आध्यत्मिक साधना आज जरूर आहे. अशाच प्रकारची साधना बाबांनीं आपल्या भक्तांना सांगितली आहे. आजची परिस्थिति अशी आहे कीं जागा, वेळ व पैसा यांचा बहुसंख्य लोकांना अभाव आहे. म्हणून ज्या साधनेला पैसा लागणार नाहीं, जादा वेळ खर्चावा लागणार नाहीं व अशा तशा गुणांच्या जागेची जरूर नाहीं असें साधे व अल्पकाष्टी पण बहुगुणी साधन जें नामस्मरण त्यावर बाबांनीं विशेष भर दिला. पूजा अर्चा, व्रतवैकल्यें यांचा उद्देश चित्त शुद्ध करणें हा आहे. नामस्मरणानेही ही गोष्ट साध्य होते. मन हें भटकें आहे. नानाकल्पना व भ्रम उत्पन्न करून तें माणसाला सदैव चुकीच्या मार्गावर नेत असतें पण त्या मनाला नामस्मरणाचा चाळा लागला तर त्याची भटकेगिरी व कल्पनेच्या भराऱ्या मारण्याची वृत्ति कमी होतात व तें स्थिर होते. विकारवासना उत्पन्न करण्याचें मनाचें कार्य थंडावते. असें झालें म्हणजे चित्त शुद्ध होतें. म्हणून नामस्मरणाला बाबांनीं अति महत्त्व दिलें आहे. मात्र अमुकच नामस्मरण करा असा त्यांनीं कधींही आग्रह धरला नाहीं. राम, कृष्ण, पांडुरंग, हरि, हर वगैरेमध्यें भेद मानणें हा केवळ कल्पनेचा पसारा आहे. भ्रम आहे. असा भ्रम झालेल्यांना साईबाबांनीं स्वतः ऐवजीं राम, कृष्ण, पांडुरंग अशी रूपे दाखवून त्यांचा भ्रमनिरास केला. भक्ति कोणाचीही करा पण ती करताना ज्याची भक्ति कराल तो कोण जाणून का. साईबाबा म्हणजे हा औट हाताचा देह असें समजून तुम्ही या देहाची भक्ती पूजा करता पण हा देह म्हणजे साई नव्हे. तर माझ्या हृदयांत जो बसलेला आहे तो खरा साई आहे. तोच सत्यसाई आहे. त्याला ते हृदयस्थ म्हणत. हा हृदयस्थ सर्व प्राणि मात्रांत आहे. सर्वांच्या ठायीं असलेला हा जो हृदयस्थ तोच परमेश्वर. जो माझ्यांत तोच तुमच्यात, तोच शेजाऱ्यांत व तोच सर्वात असें पटवून देऊन तुमचा भ्रम घाल-

विण्यासाठीं मी आलो आहे असें स्पष्टपणें बाबांनीं सांगितलेआहे जें. माझ्यांत तेंच सर्व प्राणिमात्रांत पहाण्याची दृष्टी साध्यकरून घ्या म्हणजे आत्मज्ञान वा मोक्ष होतो. हात हातीं येईल, ही गोष्ट साध्य होण्यासाठीं नामस्मरणाणें सदाचारावरही बाबानीं भर दिला आहे. कारण सदाचारानें चित्त शुद्ध होतें. म्हणून ज्या योगें सदाचार साधेल अशा गोष्टी करण्यासंबंधी ते वेळोवेळीं सांगत असत. भूतदया, जशी आपली भूकतहान इतरांची, सर्वांचा पालन करता एकच, आपण सर्व बंधु भगिनी, दया, कडकवट व कुत्सित न बोलणें, सदैव शांति धरणें, आनंदी असणें, लोभ न धरणें, निंदा न करणें आंतून शिव्या व बाहेरून स्तुति असें न वागणें, निर्भयपणा वगैरे गोष्टींना त्यांनीं आपल्या आचारधमातविशेष स्थान दिलें आहे.

## आमचें सोवळें ओवळें

बाबांचा दरबार सर्वजातिधर्मीयांना खुला असे. ते कधीं कोणास जात पात पुसत नसत कीं आपलीही सांगत नसत. कोणीही यावें व त्यांच्या पाया पडावें. सोवळें ओवळें हें प्रकरण त्यांच्याकडे नव्हते. आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरें आहोंत हें मान्य झाल्यावर लेकरांनीं आपापसांत स्पृश्यास्पृश्य भेद पाळणें व माणुसकी विरुद्ध वागणें हें तर्कशास्त्राला धरून होईल काय ? आमचें सोवळें ओवळें व स्पृश्यास्पृश्य भेद किती हास्यास्पद आहेत पहा, या बाबींत आम्हाला माणसापेक्षां मांजर अधिक जवळचें वाटते. मांजरानें कोणतें पुण्य केलें होते न कळे पण तें बेटें जन्माला आलें तें मुळीं सोवळ्यातच.

माणसाचा जन्म आपण ओवळ्यांत मानतो. पण मांजर स्वयंभू सोवळे म्हणून आजीबाईना आपल्या कडक सोवळ्यांत चुलीजवळ मांजर चालते. पण एकादा खालच्या जातीचा माणूस चुली जवळ राहो, घरांत आला तर सोवळ्याचें ओवळे होऊन ब्रह्मघोटाळा होतो. उंदरासारखा गलिच्छ मानवी शत्रू देवघरांत खुशाल फिरतो व नासधूस करतो तरी आमचें सोवळें बिघडत नाहीं नी धर्म तडकत नाहीं. आमचें आचरण, आमचा धर्म व आमचें सोवळें हें इतके कच्चें आहेत कायकीं एकाद्या साध्या सुध्या माणसाच्या नुसत्या सावलीनें त्यांत बिघाड व्हावा ? हजारों वर्षे तेजस्वीपणें तळपणारा आमचा वैदिक धर्म काय तापलेल्या काचेप्रमाणें आहे कीं एकाद्या क्षुद्र तुषारानें त्याला तडा जावा ? पावसाच्या शिंतोड्यानें सूर्य कधीतरी तडकेल काय ? आमचे देव काय इतके कमकुवत आहेत कीं शूद्राच्या सावलीनें वा स्पर्शानें बाटले जावेत ? असें असते तर आमचा सोमनाथ

परधर्मीय घोरीच्या घणाचे घाव सोसून आजही चिरंजीवपणें उभा राहिला असता काय? विसोबा खेचराच्या पायतणांनीं शंकरांची पिंडी न भंगता जशीच्या तशी राहिली असती काय? याचा अर्थ हाच कीं हें असले भेदाभेद स्पर्शास्पर्श परमेश्वराकडे नाहींत. ते निर्मीत आहेत. स्वार्थासाठीं निर्माण केले गेले आहेत. हजारो वर्षे वैदिक धर्माचरण करून जर आमचें मन अशुद्ध, स्वार्थी व रानवट भेदाभेद मानण्याइतके हलके राहिलें असेल तर मग असलें धर्माचरण केले काय च न केलें काय सारखेच. असलें धर्माचरण न करणाऱ्यांच्या ठिकाणीं अधिक माणूसकी आढळते हे पाहिल्यावर आमच्या बुद्धिवादी तरुणांची निष्ठा आपल्या धर्मावर राहवी कशी? बाबांच्या सर्वांभूतीं परमेश्वर पाहण्याचा वृत्तींत असले भेदाभेद बसत नाहींत. सर्वांभूतीं भगवंत असला तर मग तो सोवळाही नाहीं आणि ओवळाही नाहीं, तो ब्राह्मण नाहीं कीं शूद्रही नाहीं. तो सदा निर्विकार, निराकार व शुद्ध असला पाहिजे व तसा तो आहेही. म्हणून बाबांनीं स्पर्शास्पर्श, उच्च निच अशा भेदाना थारा दिला नाहीं, त्यांच्या मशीदमाई सत्रीव्यतिरक्त इतर वेळीं सर्वांना खुली असे. कोणीही यावें बाबांच्या पायावर डोई ठेवावी. हीच प्रथा बाबांना समाधिस्थ होऊन ५० वर्षे झाली तरी अजूनही शिर्डीला चालू आहे. ही समाधानाची गोष्ट आहे. महाराष्ट्रांत पवित्र क्षेत्रें कांहीं थोडी थोडकी नाहींत पण पहिल्यापासून शिर्डी हें असें एकच क्षेत्र आहे कीं जेथें भक्तानें यावें, मोकळेपणे देवाच्या पाया पडावे, फुले अर्पावींत एवढेंच नव्हे तर ठराविक वेळीं समाधीवरचढून आपल्या देवाला स्नानही घालावें. कोणत्याही प्रकारचें जातिनिर्बंध नसलेलें व कोणीही यावें व आपल्या देवाच्या चरणीं मिठी मारून आपला भाव देवापाशीं मोकळेपणें व्यक्त करावा असें एकमेव क्षेत्र म्हणजे शिर्डी व तसें तें ठेवल्याबद्दल शिर्डीसंस्थान धन्यवादास केव्हांही पात्र आहे. देव व भक्त यांचा संबंध सरळ असावा. त्यांत मध्यस्थाची जरूरी नाहीं. फक्त वाटाड्या असावा. लेकरानें आईकडे जायला काय कोणाचें ओळखपत्र लागतें? मनांत आलं सहज झेप घेऊन आईच्या कडेवर बसले, आई कोठें आहे हें बालकाला माहीत नसेल तर ती बालकाला दाखविणें एवढेंच इतरांचें काम. हाच संबंध देवभक्तांचा. मध्यस्थ हे स्वार्थासाठीं नसते निर्बंध व भेदाभेद करून ठेवतात. सुरवातीला भक्तीमध्यें माणूस हा ससासारखा भित्रा असतो. याचा फायदा मध्यस्थी घेतात व भीतीचा बडगा दाखवून हे मध्यस्थ स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेण्यासाठीं

धर्मांत नाना गोष्टी घुसडून देतात. याच पुढें रुढी होऊन मानगुटी बसतात. माणूस भक्तीपेक्षां गुलामगिरीत जास्त पडतो, खरा अध्यात्म कोणतीच गुलामगिरी मान्य करीत नाहीं. म्हणून बाबांनी आपल्यापुरती तरी ही पद्धत बाजूला सारली. यामुळें शिर्डी सर्वांना खुली होती व आजही आहे. देवानें आपल्या सेवेची agency किंवा whole and sole rights कोणालाही बहाल केले नाहींत. अध्यात्मांत देवाची सेवा ही लोकशाहीवर आधारलेली आहे, कोणीही मनांत येईल त्याप्रमाणें सेवा करावी, कोणी कोणास हटकूं नये. ही बाबांची इच्छा होती. ती बाबांच्या मागें संस्थाननें राखली आहे. अध्यात्मांतील मक्तेदारी पद्धत बाबांनीं आपल्यापुरती बंद केली. हें त्यांचें वैशिष्ट्य जोंपर्यंत पाळले जाईल तोंपर्यंत शिर्डी अमर आहे.

### दैव म्हणजे तरी काय ?

दैव की प्रयत्न असें कोडे बुद्धिवंताना पडत असतें. असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी या दैववादांत हरीनिष्ठेच्या नावाखालीं लपविलेला आळस आहे. वास्तविक दैव, प्रयत्न अशा दोन गोष्टी नाहींत. दव म्हणजे पूर्व जन्मींची कर्मफलें. कर्माचें फल होतें व फलाचें कर्म होतें. कर्म म्हणजे कृति म्हणजे प्रयत्नच नव्हे तर काय? चोरीचें फल शिक्षा. पण शिक्षा भोगणें ही कृति म्हणजे प्रयत्नच आहे. दैव म्हणजे दुसरें तिसरें कांही नसून भूतकालांतील प्रयत्नांचें फल आहे. कालच्या दिवसांतून आजचा दिवस उदयास येतो व आजच्या पोटीं उद्यांचा दिवस आहे. आजचें दैव हा कालचा प्रयत्न आहे व आजचा प्रयत्न हा उद्यांचें दैव आहे. एका प्रयत्नांतून दुसरा प्रयत्न जन्मास येतो. आपलें जीवन हें प्रयत्नाप्रयत्नांच्या, कर्माकर्मांच्या अणुरेणुनीं तयार झालें आहे. देहांत जीव आहे तों पर्यंत कांहीं ना कांहीं प्रयत्न, कृति ही चालणारच, यामुळें जें कांहीं मिळतें तें आपल्या प्रयत्नांमुळेंच मिळतें, त्याचेंच ते फल असतें. आच मिळालेलें कालच्या प्रयत्नाचें फल असेल नाहीं तर आजच्या चालू प्रयत्नाचें फल असेल. पण चालू प्रयत्नांचें फल मिळेतोंपर्यंत तो प्रयत्न थोड्या फार अंशीं भूतकाळात गेलेला असणार. म्हणजे काय कीं जे आज मिळतें आहे ते भूतकालांतील प्रयत्नाचें फल आहे. अशा प्रकरें भूतकालाच्या प्रयत्नांच्या फलांनीं आजचें जीवन बनले आहे व उद्यांचें भविष्यकालांतील जीवन आजच्या प्रयत्नांच्या फलांनीं झालेले

असेल. भूतकाळ आपल्या हातांत नाहीं, भविष्यकाळ हातांत येणारा आहे पण वर्तमान काळ मात्र हातांत आहे. पण क्षणोक्षणीं तो भूतकाळांत जाऊन आपल्या हातचा उडून जात आहे हें विसरूं नये. चांगली कृत्यें केलीं, प्रयत्न केला तर चांगलीं फळें मिळून आपला भविष्यकाळ उज्ज्वल होईल. मानवी जन्म आज मिळाला आहे. गतजन्मांतून उद्याला आलेलें हें भाग्य. मग त्या देहाचा योग्य उपयोग नको कां करायला ? कधीं न मिळणारा असा चांगला तांदूळ रेशनमध्यें मिळाला तर तो काय सांडून होळून घालवावा कीं पोषण होईल अशा प्रकारें त्याचा योग्य वापर व उपयोग करावा ? महद्भाग्यें लाभलेला हा नर देह काय सांडून होळून घालवावा कीं त्याचा स्वप्रगतीसाठीं शहाणपणें उपयोग करावा ? अध्यात्म सांगतो बाबानो देहाची निष्कारण नासधूस करून घेऊं नका. विषयांचा कैफ चढवून घेऊं नका व देहाला वासनांच्या घाणींत लोळत ठेवूं नका. अमृत मिळालें आहे. भ्रमानें त्याला विष समजून टाकून देऊं नका. विषासारखा वाटला तरी विषाचें अमृत करण्याची ताकद परमेश्वरानें मानवाला दिली आहे असें करतांना परमेश्वरानें एक अट घातली आहे. ती प्रयत्न कष्ट व श्रम. देव सांगतो कीं जीवनास जरूर तें सर्व कांहीं तुम्हास दिलंय. धान्य दिलंय, फळें पुष्पें दिल्यात. मोलवान खनिज संपत्ती दिली आहे. दिमतीला तुमची सेवा करण्यास प्राणी दिले आहेत, या सर्व ब्रह्मांडाला गवसणी घालील अशी बुद्धि दिली आहे. आणखी खूप खूप किती तरी दिले आहे की जें तुम्हांला अजून माहीत झालें नाहीं. खणा, पिकवा, श्रम करा, योग्य वापर करा व या सर्व सृष्टीचे माझ्या प्रमाणें मालक व्हा, प्रयत्नांती परमेश्वर, नरका नारायण होण्याची ताकद तुम्हास दिली आहे .माझ्याशीं खुशाल शर्यत खेळा. तुम्ही जिंकलांत तर आनंद वाटतो मला. बापसे बेटा सवाई पाहून मी आनंदानें नाचतो. मिठी मारीन मी तुम्हांला, माझ्यांत तुम्हाला व तुमच्यात मला सामावून घेईन. पण आयते मागाल तर तें जमायचे नाहीं.

**बाबांचें रोखठोक आश्वासन**

बाबा सांगतात मी कोणाला दान देत नाहीं. भीक घालीत नाहीं. तर ज्याचें त्याला त्याच्या हक्काचें देतों. श्रम करून हक्क तुम्ही मिळवा. मग ते अमलांत आणायाचें काम माझे. जेथें प्रयत्न, श्रम, कष्ठ चालतात तेथें मी हजर असतो. त्यांचा मी पाठीराखा आहे. त्यांना मी साहाय्य करतो.

तुम्ही जोर काढूं लागा । दुधाची काळजी सर्वस्वी त्यागा ।
वाटी घेऊनी उभाच मी मागा । पृष्ठ भागा आहे कीं ॥
म्हणाल जोर म्या काढावे । दुधाचे प्याले तुम्ही रिचवावे ।
हें तों आपणा नाहीं ठावें । दक्ष असावें कार्यार्थीं ॥

पण बाबांना अनुभव काय आला. श्रम करायला, प्रयत्न करायला कोणीच तयार नाहीं. हाच आमचा मोठा दोष. म्हणून बाबा सांगतात. दैव दैव म्हणून रडत काय बसलांत ? तुम्हीच निर्माण केलें आहे तें. करावें तसें भरावें. करतांना गोड वाटतें मग भरतांना रडता कशासाठीं व माझ्याकडे धावत येतां कशाला? तुमचें कर्म तुमच्यापाठीं. श्रमकरा कष्ट करा कीं मी आहेच मदत करायला. सर्व प्रकारें साहय्य करीन व मार्गदर्शन करीन. अशा प्रकारचा ठणठणीत प्रयत्नवाद बाबानीं आपल्या भक्तांना सांगितला आहे. देव भक्ति हें आयतोबाचें काम नाहीं, निदान माझ्याकडे नाहीं. येथें अनिवार अंग झिजविलें पाहिजे असें त्यांनीं एका भक्ताला स्पष्ट सांगितले आहे. नुसते हरीं हरी करीत बसण्यांत भक्ति नाहीं. भक्तीचा उगम व भक्तीचें स्थान श्रम कष्ट यांत आहे. त्यासाठीं कंबर कसा. अशा प्रकारचा प्रयत्नवाद बाबांचा आहे. हें एक त्यांचें वैशिष्यच नव्हे तर काय ?

## समाजवाद कसा निर्माण होईल ?

ज्या समाजवादाचे आज जिकडे तिकडे नगारे वाजत आहेत तो समाज वाद खऱ्या अर्थानें अस्तित्वांत आणावयाचा असेल तर सुरवात व्यक्ति पासून झाली पाहीजे. समाजवाद हें केवळ व्याख्यान देण्याचें शास्त्र नाहीं. तें कृतींत आणावयाचें शास्त्र आहे. अशा अर्थाचें एका रशियन तज्ञाचें उद्गार आहेत. समाजवाद अस्तित्वांत येण्यासाठीं, राष्ट्रांत तो रुजण्यासाठीं त्याचें बीज व्यक्तीच्या ठायीं पेरलें पाहिजे. आकाशाशीं स्पर्धा करणारा उंच विशाल वृक्ष पाहिजे असेल तर त्याचें बीज खालीं भूमीत पेरलें पाहिजे. हवेंत बी पेरून का हें कार्य साधणार ? नदी मोठी विशाल वाटली तरी तिचा उगम डोंगराच्या लहानशा कपारींत असतो. कपारच बंद झाली तर नदीपुढें वाहणार कशी ? कुटुंबांतील प्रत्येकव्यक्तीच्या मनांत, व्यवहारांत समाजवादाचा उगम होईल तेव्हां तो समाजांत दिसेल. व मग सबंध राष्ट्रीय मैदानांतून समाजवादाची गंगा दुथडी वाहताना

दिसेल. असें न झालें तर पावसाळी पाण्यावर वाहणारा ओढा अल्पजीवी होतो त्या प्रमाणें प्रचाराच्या पाण्यावर वाहणारी ही समाजवादाची गंगा आटून कोरडी ठणठणींत होईल. मुखीं समाजवाद व नेत्र स्वार्थावर असें झालें तर ढोंगाची बजबजपुरी व त्याचे साथीदार जे अनेक दुर्गुण यांचा सुळसुळाट समाजांत होईल व अंतीं असल्या समाजवादाच्या पोटीं हुकूमशाही जन्मास येईल, असें न होण्यास प्रत्येक व्यक्तीचें मन समाजवादी झालें पाहिजे. माणूस जो कांहीं पराक्रम करतो तो त्याला करावयास लावणारें त्याचें मन किंवा वृत्ति आहे इकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. जेव्हां प्रत्येक व्यक्ति आपला दैनंदीन व्यवहार समाज-वादी दृष्टीनें करील तेव्हांच खरा समाजवाद अस्तित्वांत येईल. यासाठीं अशी वृत्ति निर्माण करणारे शिक्षण बालपणापासून दिले पाहिजे व तेसुद्धां या शैक्ष-णिक तत्वाच्या आधारें. देशांतील बोलघेवड्याचें पीक जेवढें कमी होईल व कसदार दाणें जेवढें अधिक पिकतील तेवढें आम्हांला आमच्या कार्यांत अधिक यश मिळत राहील. या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन समाजवादांतील कांहीं गोष्टींचा अंगीकार बाबानी आपल्या उपदेशांत केला आहे व कांहीं धार्मिक तत्त्वांचा मेळ समाजवादाशीं घालून दिला आहे. ज्या योगें समाजवाद वृत्ति व्यक्तींत होऊं शकेल असें धर्माचरण त्यांनीं सांगितलें आहे.

### समाजवाद कशासाठीं ?

माणसाच्या मूलभूत गरजा अन्नपाणी, आसरा, व कपडा या आहेत. या तीन गोष्टीवर प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो अबाधित रहावा म्हणून निसर्ग नाना तऱ्हेच्या गोष्टी उत्पन्न करीत असतो. परंतु स्वार्थी लोक मधल्यामध्यें खाऊन बसतात व त्यामुळें बहुसंख्य लोकांना अन्न वस्त्र व आसरा यांची वाण पडते. असें होऊं नये व प्रत्येक व्यक्तिला आपल्या हक्काच्या गोष्टी जरूरी पुरत्या मिळाव्या असा समाजवादाचा प्रयत्न आहे. हें साध्य होण्यास माणसांत घेण्या-प्रमाणें देण्याची ही वृत्ति निर्माण झाली पाहिजे एवढेच नव्हे तर घेणें हें देण्या-साठीं करावयाचें असते साठवण्यासाठीं ( Cornering ) नव्हे याची जाणीव झाली पाहिजे हें साध्य व्हावे असा प्रयत्न बाबांनीं केला आहे. यासाठीं धार्मिक आचरणाच्या बाबींत अनेक ठिकाणी बाबानीं क्रांतिकारी उपदेश केला आहे. सर्व साधारण जनता देवाची भक्ती वा पूजा करते ती त्या देवाला खूष करण्यासाठीं

संतुष्ट करण्यासाठीं करीत असते. देव संतुष्ट व्हावा, त्यची आपल्यावर कृपा व्हवी म्हणजे त्यानें आपलें इच्छित पूर्ण करावे यासाठीं बहुतेक लोक पूजा अर्चा व्रतवैकल्यें, उपवास वगैरे करीत असतात. त्यासाठीं पडेल ते कष्ट करण्यास व लागेल तेवढा पैसा खर्च करण्यास ते तयार असतात. लोकांच्या या भावनेचा अध्यात्माप्रमाणें समाज कार्यांतही उपयोग व्हावा, एका दगडांत दोन्ही पक्षी मारतां यावेत म्हणून बाबा सांगतात कीं देवाला संतुष्ट करण्यास दुसरा एक साधा मार्ग आहे त्याचें अवलंबन करा. भुकेल्याला अन्न, बसाया ओसरी म्हणजे राहण्यालायक आसरा उघड्यास वस्त्र जर तुम्ही दिलेंत तर त्या योगें श्रीहरी तुष्टेल, संतुष्ट होईल. या तीन फुलांनीं हरीची पूजा केलीत तर त्यांत तुमचेंही कल्याण होईल व त्याबरोबर समाजाचेही कल्याण होईल, संकटकालीं तळमळणारे आत्मे तुमच्या मदतीनें शांत झाले व त्यामुळें ते जीवनाचा योग्य मार्ग क्रमूं लागले तर त्यांत त्यांचें कल्याण तर आहेच पण तुमचेंही आहेच. जरी तुम्हांला बाह्यतेवरून भिन्नता वाटत असली तरी त्यांचे आत्मे व तुमचा आत्मा एकच आहे. यामुळें त्यांचा आत्मा शांत झाल्यास तुमचाही होईल व तुम्हांला शांति समाधान वाटून तुमची आध्यत्मिक प्रगति होईल. आणि त्यावरोबर समाजाचेही भले होईल. पापाचा क्षय व्हावा म्हणून तुम्ही दान करतां पण असें कांहीं निराळे नाहीं. आहे तें कर्म फल व कर्म फलाचा क्षय तें भोगून होतो. यासाठीं दान करणें हा भ्रम आहे. पण माणसाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठीं एकादे चांगले दान केलेत अगर अशा प्रकारच्या योजनेला हातभार लावलात अगर मानवाचें खरें खुरें कल्याण करण्याच्या कार्याला हातभार लावलांत तर हरी संतुष्टेल. तुमच्या वाट्यास चांगली फळें येऊन तुमचा जन्म सुखांत जाईल. समाजाचीही प्रगति होईल. माणसाच्या मूलभूत गरजा जेव्हां त्याला मिळत नाहींत तेव्हां त्या मिळविण्यासाठीं तो भल्याबुऱ्या मार्गानें प्रयत्न करतो. यामुळें समाजांत स्वार्थ बळावतो व सर्व प्रकारचा भ्रष्टाचार माजतो. प्रत्येकाच्या या गरजा व्यवस्थित भागल्या तर लबाड्या, खोटेनाटे प्रकार, बनवाबनवी वगैरेना आळा पडून समाज सुरक्षित व सुखी होईल एवढेंच नव्हे तर सदाचारी होऊन मलिनता दूर झाल्यामुळें समाजाचा दर्जा उंचावेल. भूतदयेनें प्रेरित होऊन जनताजनार्दनाची केलेली सेवा फुलापानांच्या पूजा व शेंग–साबुदाण्याचे उपवास यापेक्षां शतपटीनें श्रेष्ठ भक्ति आहे. ती खरी देवपूजा आहे. आपला आत्मा व दुसऱ्याचा आत्मा एकच, जें

आपल्याला दुःख तेंच दुसऱ्याला याची जाणीव होऊन अपंग भुकेले आडलेनाडलेले यांची सेवा करणें ही हल्लीच्या काळीं सर्वांत उत्तम उपासना आहे. त्यांत व्यक्तीप्रमाणें समाजाचें व अंतीं राष्ट्राचेंही कल्याण आहे.

**बाबांची समाजवादी दृष्टि**

या संबंधी बाबाची दृष्टी लक्षांत यावी म्हणून एक उदाहरण देतो. बाबाना भूक लागली असतां त्यांना जेवूं घालण्यासाठी एका भक्तानें आणलेली ताजी ऊन ऊन भाकर स्वतः न खातां ती एका भुकेलेल्या कुत्र्यास त्यांनीं खाऊं घातली, यामुळें त्या भक्तास वाईट वाटले. तेव्हां बाबा म्हणाले कीं माझा व त्याचा आत्मा एकच. जशी मला भूक तशीच त्यालाही. त्याची भूक शांत झाली, माझीही शांत झाली. जो कोणी हें जाणून भुककेलेल्याला अन्न देईल त्यानें तें खरें खरें देवाच्या मुखीं घातलें असें होईल. देवपूजा व नैवेद्य संबंधी बाबाचे अशा प्रकारचे विचार होते. या सर्व विवेचनाचा असा मात्र अर्थ नव्हे कीं कोणी पूजाअर्चा उपास तापास करूं नयेत. ज्यांना हौस असेल, करण्याची ताकद असेल, वेळ व पैसा असेल, त्यांनीं त्या खुशाल कराव्यात. पण हल्लीची एकंदर परिस्थिति व पूजेमागील वृत्ति ही लक्षांत घेतां अंतीं या सर्व गोष्टी निरर्थक होतात व आर्थिक दृष्ट्याही त्रासदायक होतात म्हणून आपल्याला त्यांची जरुरी नाहीं एवढेंच बाबांचें म्हणणें आहे. माणसानें उंची वस्त्राचा पोषाख करावा व माणसाला उंची वस्त्रें लागतात या दोहोंमध्यें जो फरक आहे तोच फरक देवाला द्यावे व देवाला लागते यामध्यें आहे. यापैकीं दुसरा प्रकार बाबाना मान्य नाहीं. माणसामाणसाच्या ताकदींत कौशल्यांत व ज्ञानांत भिन्नता असते. कोणीही सर्वज्ञ व सर्वकर्तृत्व असलेला मिळणें नाहीं. यामुळें एकमेकास एकमेकाची गरज लागते. कोणाकडून ही आपलें काम करवून घ्यावें. पण त्याचे श्रम ओळखून योग्यतो मोबदला त्याला द्यावा. फुकट श्रम कधींही कोणाकडून घेऊं नयेत. बाबाचें हें सांगणें समाजवादाशीं समन्वय साधणारे नव्हे काय ? कोणत्याही धार्मिक रुढ पद्धतीला बाबांनीं विरोध केला नाहीं. इतर काय करतात व काय करावें यापेक्षां आपण काय करतो व काय करावें हें त्यांना अधिक महत्वाचें वाटे. यामुळें खंडन मंडन हें प्रकरण त्यांच्याकडे नव्हते. मी बरोबर व बाकी चूक ही त्यांची भाषा नव्हे. विरोधांतून समन्वय साधण्याची त्यांची वृत्ति होती. याच वृत्तीनें त्यानीं आपलें जीवित व्यतींत केलें. आध्यात्मामध्यें व्यक्ति व समाज या दोहोंचे अस्तित्व धरून धर्मानें व्यक्ति-

गत कल्याणाबरोबर समाज व राष्ट्र यांचेंही कल्याण साधले पाहिजे ही बाबांची धर्माकडे पहाण्याची दृष्टी तें एक त्यांचें वैशिष्ट्यच आहे.

## बाबांची कार्यपद्धती

बाबांच्या संबंधीं लिहावें तेवढें थोडेच आहे. अनंताचें वर्णन कोण करूं शकेल ? ज्याला अस्तित्व नाहीं व नास्तित्व नाहीं असा तो अनंत, तें ब्रह्म मनुष्य देहधारी झालें म्हणून काय संपूर्ण आकलन करतां येईल ? जशी दृष्टी तशी सृष्टी पहावें तसा तो दिसतो, वाटतो.तसबीर असते ना ? उजवीकडून पाहिलें कीं राम दिसतो, डावीकडून पाहिलें कीं कृष्ण दिसतो व समोरून पाहिलें तर दत्त दिसतो. भगवद्गीता नाहीं का ज्ञान्याला ज्ञानमार्गी, भक्ताला भक्तिमार्गी, संन्याशाला संन्यासमार्गी इतर कोणाला कर्म मार्गी वाटते ? तसेंच ब्रह्माचें. तसेंच बाबांचें. ज्याला जसे अनुभव येतात तसा तो बाबाना समजतो. मला जें भासलें तें येथें व्यक्त केलें आहे. इतर संतांपेक्षां मला बाबा पुष्कळ निराळे दिसतात. कसे तेंच येथवर सांगत आलों. आणखी एक सांगावेंसें वाटते. तें म्हणजे बाबांची कार्य-करण्याची पद्धति. कोणतेही कार्य करायचें म्हटलें कीं त्याला माणसे व पैसा पाहिजे. बाबानींही कार्य केलें. पण त्यासाठीं लागणारा पैसा कोणाकडे मागितला नाहीं कीं फंड उभारला नाहीं. दक्षिणा मागत पण स्वतःच्या कार्यासाठीं नसे. जी दक्षिणा येई ती सर्व बाबा वाटून टाकीत. आजची जमा व उद्यांची शिल्लक ही सदरें त्यांच्याकडे नव्हती. उद्यांची चिंता परमेश्वराला. आपण कशाला करा ? याप्रमाणें ते वागले व भक्तानाही तेंच सांगत आले. सदा असावें निर्भय असें तें म्हणत. निर्भयता ही एक फार मोठी शक्ति आहे. कार्याची नुसती चिंता करीत बसूं नये. त्यानें कार्याचा नाश होतो. बाबा जें कार्य करावयाचें असेल त्या बद्दल त्यांनीं कधीं चिंता केली नाहीं कीं कोणाकडे नुसतें बोललेही नाहींत. त्यांच्या मनांत काय योजना आहे याचा थांगपत्ता कोणासही लागत नसे. कार्य झालें कीं मग समजे कीं त्यांच्या मनांत अमुक अमुक होतें. बसल्या जागीं ते कार्य कसें करीत, सूत्रें कशी हलवीत, हें पुष्कळांत उमगत नाहीं.

आपली कार्य करण्याची पद्धति बाबांनीं कांहीं वेळां ध्वनित केली आहे.ती स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो. कठीण आहे हें. पण प्रयत्न तर करूं. बाबांच्या जीवनांत एक गोष्ट स्पष्ट दिसते व ती म्हणजे न मागतां बाबांना पैसा मिळे व न सांगता

त्यांच्याकडे माणसे येत. हें कसें? बाबांचा 'हृदयस्थ' हा शब्द महत्त्वाचा आहे. त्याचा अर्थ या लेखांत स्पष्ट केलेला आहे. बाबा सांगत:—तुमचा हृदयस्थ तो मीच . तुमच्या हृदयांत हृदयांतून मी वास करून आहे. आपला आत्मा आणि परब्रह्म एकच. हें सत्य आहे. तुमचा आमचा हे भेद आहेत. कल्पनेचा पसारा आहे. मनाचा खेळ आहे. कल्पनेचे खेळ करणारा मी कांहीं गारुडी नाहीं, मला सर्वांठायीं एकच आत्मा एकच ब्रह्म दिसतें. सर्व प्राणिमात्राशीं माझी एकात्मता आहे. म्हणून माझ्या हृदयाची जी प्रेरणा ती इतरांच्या हृदयांची प्रेरणा सहज होऊं शकते. मी मनांत आणीन तें त्यांच्याही मनांत आणूं शकतो. यामुळें कोणाच्याही हृदयांत कार्याची प्रेरणा करणारा मीच व तें कार्य करवून घेणारा मीच. हृदया हृदयस्थामधील एकात्मता बाबांच्या ठायीं असल्यामुळें त्यांना जें पाहिजे असेल तें देण्याची प्रेरणा ते कोणाच्याही ठिकाणी करीत असत. यामुळें कार्यासाठीं जरूर तो पैसा व माणसें येत असत व कार्य उठत असे. याची साक्ष म्हणजे आजचें समाधि-मंदीर होय. त्यांच्या मनांत आलें म्हणून त्यांनीं वाडा बांधवून घेतला. मनांत होते म्हणून तेथें मुरलीधराची स्थापना करण्यासाठीं मूर्ति करविण्यांत आल्या व मनांत होतें म्हणून बाबा स्वतःच मुरलीधर होऊन तेथें जाऊन बसले. वाड्याचें समाधिमंदीर झालें. या कामीं लागणारा पैसा व माणसे बाबानीं त्या त्या व्यक्तीना, प्रेरणा करून उभी केली व मनांतील हेतू पूर्ण करून घेतला. अजूनही बाबा ह्या एकात्मतेच्या साह्यानें कार्य करीत आहेत. कोणालाही कोण-त्या रूपानें उभे करून संकटकालीं आपल्या भक्तांना मदतीचा हात ते देत अस-तान, हें अनेकांच्या अनुभवास येत आहे. ज्याला ब्रह्मज्ञान झालें, सर्वकाळीं सर्व ठिकाणीं एकच आत्मा तो एकच एक परमेश्वर आहे अशी ज्याची वृत्ति बनून गेली त्याला मनांत येईल तें मिळविणें व पाहिजे तें कार्य घडवून आणणें अशक्य नसतें. ही गोष्ट बाबांनीं शिर्डीला एके ठिकाणीं सुमारे साठ वर्षे राहून स्वतःच्या उदाहरणानें सिद्ध करून दिली आहे. प्रेरणेच्या जोरावर कार्य करवून घेण्याची बाबांची ही शक्ति अतर्क्य नव्हे काय? बाबांच्या नंतर भक्तांचे कसें होईल अशी चिंता एका भक्तानें व्यक्त केली असतां बाबा म्हणाले, अरे, भीति कशाची, मी गेल्यावर माझ्यामागें या शिर्डीला मुंग्यासारखी माणसे येतील; माझीं हाडें समाधीमधून तुमच्याशीं बोलतील. मी जात नाहीं व

जाणार नाहीं, येणेंच मला नाहीं तर जाणे कोठून असणार? सर्वांचा आत्मा तोच मी. माझ्यावर निष्ठा ठेवा. निर्धास्त रहा. प्रयत्नांची कास सोडूं नका. मग माझ्यावर सर्व सोपवा. वकिलाकडे केस दिल्यावर आपण विचार करावयाचा नाही. तो सांगेल तेच व तेव्हांच बोलावयाचें. बाकी गप्प बसायचें. जें सांगायचें तें आपल्या वकीलाला, आपल्या वतीनें तो सर्व कांही करतो. म्हणून बाबा सांगतात कीं मिटल्या तोंडी आपलें कर्तव्य करा म्हणजे मग जें कांहीं करावयाचें तें सर्व मी करीन, तुमचें सर्व प्रकारें कल्याण करीन. असें हे शिर्डिचे साईबाबा आहेत.

बाबांचें जीवन, त्यांची बोलण्याची धाटणी, त्यांची कार्य पद्धति व भक्तांचें कल्याण करण्याचे त्यांचें मार्ग, हें सर्व लक्षांत घेतलें कीं असें मनांत येतें कीं, या देवाचा खेळ निराळा.

# साईनाथ वंद्य एक सद्गुरू जनीं

अर्ध शतक होय पुरें आज जाउनी
साईनाथ वंद्य एक सद्गुरू जनीं ॥ ध्रु० ॥

भक्तकाज कैवारी करि संकट दूर
भक्त असो जवळीं वा मैल किती दूर
श्रद्धा नी सबुरीचा मंत्र देऊनी
साईनाथ वंद्य एक सद्गुरू जनीं ॥ १ ॥

भक्त कुणी निंदक वा नास्तिकही जरी
दर्शनेंच विरघळला स्तिमित अंतरीं
राव रंक सान थोर भेद ना मनीं
साईनाथ वंद्य एक सद्गुरू जनीं ॥ २ ॥

दुसऱ्याचे श्रमहि फुकट घेइना कधीं
ऋण काढुनि सण करणें मति न ही सुधी
परनिंदा दूषण हें देइ फेकुनी
साईनाथ वंद्य एक सद्गुरू जनीं ॥ ३ ॥

जो जो जें करिल तसें भरिल सर्वथा
सत्य करुनि दावी निज बोल ना वृथा
स्मरण करा नित्य तुम्ही शयनिं भोजनीं ॥४॥
साईनाथ वंद्य एक सद्गुरु जनीं

वन्ही जरि गुप्त होय प्रगट घर्षणें
पाझरेल साइ तसा भक्तिवर्षणें
चिंतन करि भक्तांचें नित्य निशिदिनीं
साईनाथ वंद्य एक सद्गुरू जनीं ॥ ५ ॥

दिसते ना मूर्ती जरी चाल बोलती
पाठीशीं नित्य उभा भक्त संगतीं
कोठुनि कशि दाविल कळ युक्ति योजुनी
साईनाथ वंद्य एक सद्गुरू जनीं ॥ ६ ॥

धनदौलत मान नको स्मरण हा तुझें
कीर्तनगुणस्तवनाविण नावडो दुजें
रक्ष रक्ष साईनाथ पदरिं घेउनी
साईनाथ वंद्य एक सद्गुरु जनीं ॥ ७ ॥

ग. रा. भट

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **श्रीसाईसच्चरित्र** | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**–by Pradhan | | | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** (Telgu) | | | १-०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | **साईबाबा–अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१५) | **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | **Guide to Shirdi** (English) | | | ००-१२ |
| (१८) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 9½″ × 13½″ medium | **00-37** |
| (2) | ,, ,, in Dwarkamai 9½″ × 13½″ medium | **00-50** |

Other different poses of Sai baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office ' Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14